MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • १९३५ • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष अकरावे / अंक ५ / एप्रिल २०१०

## संपादकीय

## शिक्षण हक्क विधेयक

१ एप्रिल २०१० पासून शिक्षण हक्क विधेयकाची, म्हणजे ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. एक क्रांतिकारक विधेयक म्हणून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. कुठल्याही चांगल्या गोष्टीचे स्वागत होणे यात काही गैर नाही, परंतु स्वप्नाळू, भोळेभाबडेपणाने अशा गोष्टींकडे बघणे म्हणजे स्वत:ची फसवणूक करून घेणे होय! नुसत्या चांगल्या गोष्टींसाठीची सदिच्छा व त्यासाठी केलेले कायद्याचे उपाय यांनी चांगली गोष्ट घडली आहे असा अजूनपर्यंतचा अनुभव नाही.

गेल्या साठहून अधिक वर्षांत आपण आपली घटना व त्यातील शंभरहून अधिक बदल यांतून कायद्याचे जंगल तयार केले आहे. वरपासून खालच्या स्तरापर्यंतच्या न्यायालयांमधून आज इतके दावे प्रलंबित आहेत की आजपासून नवीन दावे घेणे थांबवले तरी पुढील वीस-पंचवीस वर्षांतही या दाव्यांचा निचरा (निपटारा) होणार नाही. कारागृहांची संख्या वाढूनही ती एवढी भरली आहेत, की शिक्षेचा कालावधी संपायच्या आधीच हजारो कैद्यांना सोडून द्यावे लागत आहे.

आजच्या जीवघेण्या भ्रष्टाचाराचा उदय हा या कायद्यांचे ओझे व न्यायालयांना लागणारा विलंब यामध्येच आहे. जेव्हा सनदशीर मार्गांनी या वा इतर गोष्टी घडत नाहीत, तेव्हा सामान्य माणसाला कायदेबाह्य मदत घेण्यावाचून पर्याय नसतो. आजच्या राजकीय नेतृत्वाने याचाच पुरेपूर फायदा उठवलेला आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत राजकारणामधील घराणेशाही वाढताना दिसणे हा याचाच परिणाम आहे.

या पेक्षाही गंभीर बाब म्हणजे सवलग्रस्तता व आरक्षणाची समाजाला लागलेली सवय. सरकारी असो, शैक्षणिक असो वा सामाजिक असो सर्व व्यवस्थांमधून आपल्या लायकी व गरजेपेक्षा जास्त लाभ घेण्याची वाढती मानसिकता ही आज या 'हक्कांच्या' कायद्यांमुळे दृढ झालेली दिसून येते. अशा व्यवस्थांमधून माझी ऐपत असली व गरज नसली तरीही फुकट घेण्याची प्रवृत्ती हा त्या अधिकारांचा अर्थ होऊन बसला आहे.

(कव्हर नंबर ३ वर)

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

*(१४ एप्रिल हा डॉ. वा. ना. बेडेकर यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने – संपादक)*

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२–४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२–५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्या प्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष. डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले |
| १९९९–२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००–२००१ | जोशी–बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद लळित)




वर्ष अकरावे / अंक ५/ एप्रिल २०१०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे/अंक १० वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापन शास्त्रातील विचारवंत (उत्तरार्ध) | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | ३ |
| २) | महायोगी श्री अरविंद आणि महाराष्ट्र | नरेन्द्र नाडकर्णी | ७ |
| ३) | कालाय तस्मै नम: | सौ. मानसी सलिल देशमुख | १४ |
| ४) | संन्यास | श्री. यशवंत माने | १६ |
| ५) | साहित्य – जगत | श्री. शरद जोशी | १९ |
| ६) | जीवेत् शरदः शतम्! | श्री. सुरेंद्र लागू | २१ |
| ७) | उपनिषदातील नीती विचार | श्री. शं. बा. मठ | २५ |
| ८) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ३० |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा आणि स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून, संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने '**दिशा**' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.**

**संपादक, दिशा**
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# व्यवस्थापन शास्त्रातील विचारवंत
## (उत्तरार्ध)

*व्यवस्थापनशास्त्रातील विचारवंतांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या लेखाचा हा उत्तरार्ध – संपादक*

### ८) चार्लस बॅबेज (Charles Babbage) (१७९२–१८७१) :

हा ब्रिटीश असून, गणिताचा प्राध्यापक होता. संगणकाचा जनक म्हणून त्याची ओळख जगाला जास्त आहे. त्याने जगातील पहिले गणकयंत्र (Machanical Calcutalor) आणि Analytical Engine या नावाचा संगणक बनवला.

श्रमविभागणीचा तो समर्थक होता. त्याचे म्हणणे असे होते ही फॅक्टरीतील प्रत्येक कामाचा विचार केला गेला पाहिजे, म्हणजे त्यातील प्रत्येक भागाला लागणाऱ्या कौशल्याचा (Skill) नीट विचार केला जाईल. प्रत्येक कामगाराला त्या भागाला लागणारे कौशल्य शिकवावे. त्याच्यासाठी त्याला शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम करावे. यामुळे निश्चितच उत्पादकता वाढते. त्याच्या मते व्यवस्थापन व कामगार यांचे योग्य सहचर्य असावे.

### ९) हेन्री लॉरेन्स गॅण्ट (Henry Laurence Gantt) (१८६१–१९१९) :

गॅण्ट हा मेकॉनिकल इंजिनियर होता. टेलरच्या तत्त्वांचा तो समर्थक होता. व्यवस्थापनशास्त्रात त्याने मोलाची भर घातली. मालक व कामगार संबंधातील मानवी दृष्टिकोनाच्या बाबत तो आग्रही होता.


काम आणि बोनस (Task and Bonus) आणि गॅण्ट चार्ट (Gantt's Chart) व्यवस्थापनशास्त्राला त्याने दिलेल्या दोन देणग्या आहेत.

गॅण्टच्या या चार्टवरून पुढे प्रगत अशा मैलाचा दगड पद्धतीचे अंदाजपत्रक (Milestone budgeting), प्रकल्पमापन आढावा तंत्र (Programme Evaluation and Review Technique) व कळीचे तंत्र (Critical path Method) या तंत्रांचा विकास झाला आहे.

गॅण्ट चार्ट पद्धतीत आलेखाच्या स्वरूपात कालमर्यादा आणि प्रकल्पातील कामाचा टप्पा यांची संगती दर्शवलेली असते. 'क्ष' अक्षावर वेळ तर 'य' अक्षावर अ, आ, इ, ई, उ हे कामाचे टप्पे दर्शवले आहेत.

'अ' टप्प्यावर काम सुरू होते व 'उ' टप्प्यावर पुरे होते. मधले टप्पे हे एक टप्पा संपूर्ण प्रकल्प १० महिन्यांत म्हणजे जानेवारीत सुरू होऊन ऑक्टोबर मध्ये संपवायचा असेल तर 'अ' टप्पा जानेवारीत 'उ' टप्पा ऑक्टोबरमध्ये संपायला हवा. अशा तऱ्हेने वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे काम सुरू व संपत राहील. संपूर्ण प्रकल्प ऑक्टोबरमध्ये संपेल. (आकृती क्र. १ पहा)

अशा प्रकारे, गॅण्टने व्यवस्थापनशास्त्रात नि:संशय मोलाची भर घातली आहे.




**आकृती क्र. १ : गॅण्ट चार्ट**

### १०) फ्रँक गिल्ब्रेथ (Frank Gilbreth) (१८६८–१९२४) व लिलियन गिल्ब्रेथ (Lillian Gilbreth) (१८७८–१९७२) :

वयाच्या १७ व्या वर्षी गवंडीकाम करणारा फ्रँक १० वर्षांतच मुख्य अधिक्षकपदी पोहोचला. एकदा गवंडीकाम करीत असताना ठरावीक वेळेत ठरावीक पाच विटा बसवायच्या होत्या. फ्रँकने संपूर्ण पद्धतीचा अभ्यास केला व तेवढ्याच वेळेत १८ विटा बसवायची पद्धत शोधून काढली.

लिलियन ही औद्योगिक मानसशास्त्रज्ञ होती. फ्रँकच्या अकाली निधनानंतर तिने त्याचे कार्य पुढे चालवले. व्यवस्थापनाचे मानसशास्त्र या विषयात तिने डॉक्टरेट मिळवली. परड्यू (Purdue) विद्यापीठात व्यवस्थापनशास्त्र या विषयात अध्यापन केले.

फ्रेड्रिक टेलरच्या विचारसरणीचे फ्रँक व लिलियन दोघेही समर्थक होते. त्यांनी या विचारसरणीचा भरपूर प्रसार केला.

### ११) मॅक्स वेबर (Max Waber) (१८६४–१९२०) :

मॅक्स वेबर जर्मन समाजशास्त्रज्ञ होता. Bureaucretic Management ची त्याने तत्त्वे स्थापली होती. त्याने चर्च, सरकारी खाती, सैन्यदले, औद्योगिक क्षेत्रे यांचा अभ्यास करून प्रतिपादले की सर्व सामाजिक संस्थांचा पाया हा अधिकार, अधिकाराची उतरंड आणि नोकरशाहीच्या तत्त्वावर आधारिरि आहे.

### १२) मेरी पार्कर फोलेट (Mary Parker Follet) (१८६८–१९३३) :

मेरीने संस्थांतील मानवी संबंधांवर भर दिला होता. मानवी व्यवहार दृष्टिकोन (Behavioural Approach) या व्यवस्थापनशास्त्रातील विचारवंत होती. ती सामाजिक तत्त्ववेत्ती होती आणि व्यवस्थापनशास्त्रात तिला विशेष रस होता.

व्यवस्थापक व कर्मचारी हे एकाच संस्थेचे घटक असतात, त्यामुळे त्यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक आहे, असे तिचे मत होते.

### १३) लेंडॉल ए. उरविच (Lyndall E. Urwick) :

लेंडॉल हा लेखक होता. शिवाय, एक श्रीमंत उद्योगपती होता. त्याच्या लेखनातून व्यवस्थापनशास्त्रातील त्याच्या सखोल ज्ञानाचे सम्यक् दर्शन होते. लेंडॉल संघटनविषयक २९ तत्त्वे विकसित केली. उदा. Investigation, Forecasting, Planning, Organization, Delegation इ.


आपल्याजवळ जे आहे त्यात समाधान माना.

**१४) डग्लस मॅकग्रेगोर (Douglas McGregor) :**

व्यवस्थापनशास्त्रातील हा एक विचारवंत होता. सिद्धांत क्ष व सिद्धांत य या तत्त्वप्रणालीचा निर्माता होता. सिद्धांत 'क्ष' नुसार कामगार जबरदस्तीशिवाय काम करत नाही, तर सिद्धांत 'य' नुसार उत्स्फूर्तपणे काम करणे हे तर कामगाराचे मूलभूत स्वरूप असते, अशी परस्परविरोधी वाटणारी विचारसरणी त्याने मांडली.

**१५) अब्राहम मास्लो (Abraham Maslow) :**

मास्लोने व्यवस्थापनशास्त्रात आपले योगदान दिले आहे. त्याचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे मानवाच्या भौतिक गरजांबाबत त्याने पिरॅमिडच्या स्वरूपात मांडलेले आपले विचार. (आकृती २ पहा.)




**आकृती क्र. २ : मास्लोचा गरजांचा आलेख**

**१६) फ्रेड्रिक हर्झबर्ग (Frederick Harzberg) :**

या विचारवंताने The Motivation Hygiene Theory (किंवा Two need Theory of Motivation) विकसित केली.

चांगली भावना ही कामाचे स्वरूप (Job content) व वाईट भावना ही कामाचा संदर्भ (Job Context) यांच्याशी संबंधित असते. याचसाठी कामाच्या ठिकाणी सुयोग्य वातावरणाची गरज असते.

**१७) रेंसिस लिकेर्ट (Rensis Likert) :**

रेंसिस हा त्याच्या नेतृत्व विषयक संशोधनासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या संशोधनावरून त्याने असा निष्कर्ष काढला की कामगाराची उत्पादकता व कामाचे समाधान हे नेतृत्वशैलीवर अवलंबून असते.

त्याने व्यवस्थापनाच्या ४ पद्धतींचा वापर केला. लोकशाही पद्धतीच्या नेतृत्वार त्याने भर दिला. यामध्ये कामगार व नेता यांच्यात विश्वास असावा, तसेच समस्या सोडवण्याच्या कामात कामगारांना सहभागी करून घ्यावे, असे त्याचे मत होते.

**१८) ख्रिस अॅग्रीस (Chris Argyris) :**

ख्रिस हा समाजशास्त्रज्ञ त्याच्या The fusion process theory of organiztion व Immaturity maturity model of personality या शोधासाठी प्रसिद्ध आहे.

व्यवस्थापनाने व्यक्तिगत कामगार व संस्था या दोघांच्या मागण्या पुरवण्यावर भर द्यावा, असे त्याचे मत होते.

**१९) कुर्ट लेविन (Kurt Leuin) :**

कुर्ट या व्यवस्थापनातील शास्त्राज्ञाने "Force field" theory of change या तत्त्वाची तरफदारी केली.

**२०) डेव्हिड मॅकक्लेलॅंड (David McClelland) :**

यांनी "The 3 need theory of motivation" हे तत्त्व विकसित केले.

**२१) रॉबर्ट आ. ब्लेक (Robert R. Blake) व माऊटन (Maution) :**

या दोघांनी मानवी संबंधातील नेतृत्व शैलीची

चौकट (The managerial Grid) विकसित केली.

**२२) हरबर्ट ए. सिमॉन (Herbert A. Simon) :**

या विचारवंताने निर्णयक्षमता या विषयाची व्यवस्थापनशास्त्रात प्रभावीपणे भलावण केली.

**२३) ह्यूगो मुस्तेबर्ग :**

हा औद्योगिक मानसशास्त्राचा प्रणेता म्हणून मान्यता पावलेला विचारवंत व्यवसायाने डॉक्टर होता. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रायोगिक मानसशास्त्राचा प्राध्यापक म्हणून ही त्याने काम केले. तिथेच त्याने वेगवेगळे प्रयोग करून 'मानसशास्त्र व औद्योगिक सुयश' या नावाचा ग्रंथ लिहिला.

योग्य कामाला योग्य मानसिक घडण असलेली व्यक्तीच नेमणे आवश्यक, कामगाराकडून उत्कृष्ट कामासाठी त्याची मानसिक जडण घडण करणे गरजेचे व संपूर्ण औद्योगिक क्षेत्राच्या प्रभावाने कामगारास कामास हुरूप असे त्याचे विचार होते.

**२४) वॉल्टर डील स्कॉट :**

हा इटालियन शास्त्रज्ञ होता. याने अनेक पुस्तके लिहिली. 'संपूर्ण समाज हा अनेक छोट्या छोट्या समाजांचा बनला आहे. हे छोटे समाज वरवर पाहता वेगळे असले तरी एकमेकांशी संबंध राखून सामाजिक संतुलन प्रस्थापित करतात. ही सामाजिक प्रक्रिया जरी आपोआप घडत असली तरी समाजातील उच्चभ्रूंनी समाज संतुलन साधण्यासाठी वेळोवेळी पुढाकार घेणे आवश्यक आहे.' असे याचे मत होते.

**सारांश :**

व्यवस्थापनशास्त्र हे काही एकदम विकसित झालेले नाही. अनेक विचारवंतांनी अव्याहत चालवलेल्या विचारमंथनातून ते आकारास आले. त्याच्या विविध शाखा उपशाखा निर्माण झाल्या, फुलल्या व विकसित होत गेल्या. हे श्रेय सर्वांचेच, यात वाद नाही.

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल, स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८
smathalye42@gmail.com.

●●●

बोटांचे ठसे हा गुन्हेगारी जगामधील एक महत्त्वाचा पुरावा मानण्याचा जगभर प्रघात आहे.

१८९२ साली अर्जेंटिना मध्ये एका खुनाच्या तपासाच्या खटल्यात ठशांचा असा वापर प्रथम करण्यात आला होता. परंतु तेव्हापासून बोटांचे ठसे हा पुरावा होऊ शकतो का, याबाबत आजही संशोधन चालू आहे. जुन्या भावांचे बोटांचे ठसेही सारखे नसतात असे म्हटले जाते. २० मार्च २०१० च्या न्यू सायंटिस्टच्या अंकात 'फिंगर प्रिंटस् टू गो सायंटिफिक अॅट लास्ट' या लेखात या विषयासंबंधात चर्चा आली आहे.

<u>संदर्भ</u> - 'न्यू सायंटिस्ट' २० मार्च २०१० खंड २०५; क्र. २७५२, पृ. १०, ११

# महायोगी श्री अरविंद आणि महाराष्ट्र

*महायोगी अरविंदांचा महाराष्ट्राशी आलेला संबंध या लेखातून स्पष्ट केला आहे – संपादक*

महायोगी श्री अरविंदाचा जन्म १८७२ मध्ये बंगालमधील एका सधन कुटुंबात झाला. वयाच्या ६ व्या वर्षापासून २० व्या वर्षापर्यंत १४ वर्षे त्यांनी इग्लंडमध्ये राहून शिक्षण घेतलं. इ.स. १८९३ मध्ये ते भारतात परत आले. १८९३ ते १९०५ पर्यन्त १२ वर्षे त्यांच वास्तव्य बडोद्यात होते. याच काळात श्री अरविंदांचा मराठी भाषेशी, मराठी संस्कृतीशी आणि अनेक मराठी माणसांशी संबंध आला. महाराष्ट्राचा इतिहास आणि मराठी बाणा याविषयी त्यांना वाटणारी आत्मीयता त्यांच्या लिखाणात अनेक ठिकाणी आपणांस दिसून येते. जीवनाची प्राथमिक जडणघडण आणि सर्व शिक्षण इंग्रजी भाषेतून आणि तेही पाश्चिमात्य वातावरणात राहून घेऊनही भारतीय संस्कृती आणि भारतीय विचारधारा



**महायोगी श्री अरविंद घोष**

यांच्याशी जोडलेली त्यांची जन्मजात नाळ कधीच तुटली नाही. प्राचीन भारताच्या देदिप्यमान इतिहासाचा जाज्वल्य अभिमान तर त्यांनी नेहमीच बाळगला. परंतु मध्ययुगीन काळात परकीय आक्रमकांना झुंज देऊन हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा, भारतीय संस्कृती टिकवून धरण्याचा जो महान पराक्रम, शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रानं केला त्याचं महत्त्व ओळखण्याइतकी जाणीव त्यांच्याइतकी इतरांमध्ये क्वचितच आढळेल.

**बडोद्यातील वास्तव्य :**

बडोद्याच्या १२ वर्षाच्या वास्तव्यात श्री अरविंदांनी सयाजीराव गायकवाडांच्या पदरी निरनिराळ्या खात्यांत कामे केली. पुढे त्यांची नेमणूक महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून झाली. १९०५ नंतर कांही काळ त्यांनी प्राचार्य म्हणूनही कार्यभार संभाळला. सयाजीराव त्यांना अनेकवेळा महत्त्वाची पत्रे लिहिण्यास सांगत. अनेकदा सयाजीरावांची भाषणेही लिहून द्यावी लागत. बडोदा संस्थानच्या राज्यभाषा दोन. एक मराठी व दुसरी गुजराथी, यामुळे अरविंदांनी या दोन्ही भाषांचा काही प्रमाणात अभ्यास केला. श्री. फडके नावाच्या गृहस्थाकडून ते मराठी भाषा शिकलेच; परंतु मोडी लिपीही त्यांनी आत्मसात केली. बडोदा येथील कॉलेजमध्ये त्यांचे अनेक मराठी विद्यार्थी होते. त्यापैकी श्री. आर. एन. पाटकर वकील यांनी श्रीअरविंदांच्या अनेक आठवणी लिहिल्या आहेत. रियासतकार सरदेसाई त्या काळात बडोद्यांत होते. अनेकदा ते श्री अरविंदांबरोबर फिरावयास जात असत.

बडोद्यात श्री अरविंदांचे वास्तव्य खासेराव जाधव यांच्या बंगल्यावर होते. खासेरावांचे धाकटे बंधू माधवराव जाधव यांचेशी अरविंदांचे विशेष संबंध होते. खासेरावांच्या समवेत ते अनेकदा भोजनही करत पण ते

अस्सल मराठी जेवण त्यांना तिखट वाटे. मात्र पुढे काही वर्षांनी लो. टिळकांच्या घरी त्यांनी भोजन केलं. ते मात्र त्यांना खूप आवडलं व त्याचा उल्लेख करताना त्यांनी 'Spartan Meal' असा केलेला दिसतो.

**बॅ. केशव गणेश देशपांडे :**

श्री अरविंदांनी त्यांच्या पुढील आयुष्यात एकदा सहज बोलताना असा उल्लेख केला की, त्यांना फारतर २/३ मित्र होते. त्यापैकी एक म्हणजे कोल्हापूर जवळील गडहिंग्लजचे बॅ. केशवराव गणेश देशपांडे. १८८९ ते १८९२ या काळात इंग्लंडमध्येच त्यांची अरविंदांशी मैत्री झाली. १८९३ मध्ये तेही भारतात परत आले व मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या इंदुप्रकाश या दैनिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे संपादनही ते करत असत. त्यांच्याच आग्रहावरून श्री अरविंदांनी इंदुप्रकाशमध्ये 'New Lamps for the Old' ही लेखमाला लिहिली. त्यातील पहिल्या दोन लेखांनीच प्रचंड खळबळ उडवून दिली. न्यायमूर्ती रानडे यांनी दैनिकाच्या मालकाला इशारा दिला की अशाप्रकारच्या लेखांमुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला उभा राहू शकेल. अखेर श्री अरविंदाना त्यांच्या लेखातील तिखटपणा थोडा कमी करावा लागला. बॅ. देशपांडे हे त्यानंतर काही काळ बडोद्यास प्राध्यापक झाले. पुढे देशपांडे यांनी गांधीजींच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. काही काळ काँग्रेसच्या सत्याग्रहींना प्रशिक्षण देण्याचे काम गांधीजींनी त्यांच्यावर सोपवले होते.

**ठाणे शहराला भेट :**

१९०४ ते १९०५ च्या दरम्यान श्री अरविंदांनी ३ वेळा ठाणे शहराला भेट दिली. चारूचन्द्र दत्त नावाचा एक तरुण बंगाली आय. सी. एस्. झालेला अधिकारी त्यावेळी ठाणे जिल्ह्याचा कलेक्टर होता. श्री दत्त साहेब हे ब्रिटिशांच्या सेवेत असले तरी देशभक्त होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला आणि क्रान्तिकारकांच्या प्रयत्नांना त्यांची सहानुभूती होती. आपली 'भवानी मंदिर योजना' त्यांना समजावून त्यांचा पाठिंबा मिळवण्यासाठीच श्री अरविंद त्यांच्याकडे येत असत. अशाच एका प्रसंगी 'राष्ट्रमत' चे संपादक हरिभाऊ मोडक आणि वसईचे काका पाटील यांची भेट झाल्याचा उल्लेख आढळतो.

**सखाराम गणेश देऊसकर :**

याच सुमारास सखाराम गणेश देऊसकर नावाचा एक महत्त्वाचा सहकारी श्री अरविंदांना लाभला. सखारामपंतांचे कुटुंब बंगालमध्ये स्थायिक झाले होते. देऊसकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र बंगाली भाषेत लिहून महाराजांच्या कार्याची बंगाली जनतेस ओळख करून दिली. त्यांचे 'देशेर कथा' हे पुस्तकही बंगालमध्ये खूप गाजलं. ब्रिटिशांनी आपल्या देशांतील पारंपरिक उद्योग प्रथम उध्वस्त केले आणि त्यानंतर ते कशा रीतीने आपल्या देशाचं शोषण करीत आहेत, याचं विदारक वर्णन या पुस्तकांत आढळतं. 'स्वराज्य'. ह्या शब्दाचा प्रथम वापर करण्याचा बहुमान सखारामपंतांना दिला जातो. अरविंदांच्या क्रान्तिकार्यात त्यांनी बहुमोल सहाय्य केलं.

**योगीराज विष्णु भास्कर लेले :**

यानंतर श्री अरविंदांना शक्ती संपादन करण्यासाठी योगसाधना करण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. बडोद्याचे इंजिनिअर असलेले मित्र श्री. देवधर हे चांदोडच्या ब्रह्मानंदांचे शिष्य होते. त्यांच्याकडे श्री अरविंदांनी प्रथम प्राणायामाचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर त्यांची गाठ पडली ती साखरेबाबा या एका महाराष्ट्रातील योग्याशी. साखरेबाबा हेही राष्ट्रभक्त होते. पुढे श्री अरविंदांचे धाकटे बंधू बारिन यांच्या प्रयत्नानं ग्वाल्हेर मुक्कामी असणाऱ्या योगीराज श्री विष्णु भास्कर लेले यांची अरविंदांशी भेट झाली.

लेले महाराजांनी श्री अरविंदाना योगसाधनेत

मार्गदर्शन करण्याचं मान्य केलं. मात्र अरविंदांनी काही काळ तरी राजकारणापासून दूर रहावं अशी त्यांनी अट घातली. अरविंदांनी ती अट मान्य केल्यावर ते दोघे सरदार मुजुमदारांच्या बंगल्यातील वरच्या मजल्यावरील एका खोलीत जाऊन राहिले. लेलेमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली श्री अरविंद फक्त ३ दिवसांत निर्मनी अवस्थेस जाऊन पोहोचले.

श्री अरविंदांना मुंबईस एका कार्यक्रमांत भाषण करण्याचे निमंत्रण होते. श्री अरविंद मुंबईस आले. लेलेमहाराजही समवेत होते. श्री अरविंद संपूर्णपणे शून्यावस्थेत होते. त्यांचे विचार पूर्णपणे थांबलेले होते. अशा परिस्थितीत भाषण तरी कसे करणार असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. लेले महाराज म्हणाले ''तुम्ही प्रार्थना करा. आपोआप शब्द फुटत जातील''. पण श्री अरविंद म्हणाले ''प्रार्थना करणंही मला शक्य होणार नाही'' त्यावर लेले महाराज म्हणाले ''ठीक आहे आम्ही प्रार्थना करू. तुम्ही जनता जनार्दनाला नारायण मानून नुसता नमस्कार करा.'' श्री अरविंदांनी त्याप्रमाणे करताच त्यांच्या मुखातून भाषणाचा ओघ सुरू झाला. अत्यंत सुसंगत आणि प्रभावी.

**मुंबई येथील भाषण :**

मुंबईच्या या दौऱ्यात श्री अरविंदांच पहिलं भाषण १५ जानेवारी १९०८ रोजीं झालं. या भाषणात त्यांनी राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय ते स्पष्ट करून त्याची आवश्यकता प्रतिपादन केली. दुसरं भाषण १९ जानेवारीस झालं. त्याचा विषय होता 'सांप्रतची परिस्थिती' या भाषणांत श्री अरविंद म्हणाले ''पूर्वी जर कोणी म्हटलं असतं की बंगाल भारताचा त्राता होईल तर कोणीही विश्वास ठेवला नसता. देशाचा त्राता पंजाब होईल, महाराष्ट्र होईल पण बंगाल होऊ शकणार नाहीं असा सर्वांचा विश्वास होता'' या वाक्यांतून श्री अरविंदांनी महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला, देशप्रेमाला पावती दिलेली दिसते. यानंतर श्री अरविंद म्हणाले - ''युरोपिअन सुधारणारूपी मदिरेचे पान बंगालने आरंभी यथेष्ठ केले होते. त्यामुळे प्रथम देवनिष्ठ असणारा बंगाल हळू हळू शंकेखोर व नैराश्यवादी बनला. सुदैवानं काही वर्षामागे बंगालमध्ये धार्मिक प्रगती घडून आली. रामकृष्ण परमहंसासारखी विभूती परमेश्वरानेच बंगालात धाडून दिली. युरोपियन शिक्षण घेतलेल्या माणसांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या चरणी वंदन करू लागल्या आणि तेव्हापासूनच भरतखंडाला मुक्ती मिळण्याच्या कामाला प्रारंभ झाला. ''या संपूर्ण भाषणात श्री अरविंदाचा भर होता तो राष्ट्रवादाचा उदय हा इश्वरी प्रेरणेने झाला आहे आणि आपण सर्व जण ईश्वरी कार्य करत आहोत, या मुद्यावरच.

मुंबईच्या संबधातील आणखी एक आठवण इथे सांगणं आवश्यक आहे. १९०३ च्या डिसेंबरमध्ये श्री अरविंद व बारिन हे क्रान्तिकारकांच्या एका गुप्त बैठकीसाठी मुंबईस आले होते. ही बैठक ताजमहल हॉटेलात श्री. गोविंद दीनानाथ माडगावकर यांच्या खोलीत भरली होती. श्री. माडगावकर हे अरविंदांचे इंग्लंडमधील सहाध्यायी होते. या बैठकीत श्री. माधवराव जाधव यांना सैनिकी शिक्षण घेण्यासाठी जपानला पाठवण्याचे ठरले. या कामासाठी श्री. माडगावकर यांनी रु. १०००/- दिले.

**पुणे शहरास भेट :**

याच सुमारास श्री अरविंदांचं पुणे येथे गायकवाड-वाड्यात भाषण झालं. लोकमान्यांना गुरुस्थानी असणारे अण्णासाहेब पटवर्धन अध्यक्षस्थानी होते. विषय होता ''बंगालमधील राष्ट्रीय चळवळ'' भाषणात श्री अरविंदांनी राष्ट्रीय शिक्षण, त्यांतून स्फुरलेली राष्ट्रीयत्वाची भावना, स्वदेशीचा पुरस्कार आणि परकीय मालावर बहिष्कार इत्यादी मुद्दे विस्तारपूर्वक मांडले.

पुण्यातील मुक्कामात शिवराम महादेव परांजपे यांच्या 'काळ' नावाच्या वृत्तापत्राच्या कार्यालयात गोविंद पांडुरंग बापट यांनी श्री अरविंदाना बॉम्बचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

पुण्याला पर्वती टेकडीवर गेले असता श्री अरविंदांना काही आध्यात्मिक अनुभवही आला.

**नाशिक शहरातील भाषणे :**

मुंबई, पुण्याच्या पाठोपाठ श्री अरविंदांनी नाशिक, धुळे व अकोला या शहरांना भेटी देऊन तेथे व्याख्याने दिली. नाशिक येथे त्यांचं पहिलं व्याख्यान झालं ते पंचवटीतील श्रीकाळाराम मंदिरात. मंदिरातील या व्याख्यानांत श्री अरविंद म्हणाले – ''नाशिकमधील मंदिरे, वास्तू, इतिहास आपल्याकडे पाहतो आहे. आपल्या हातून देशसेवा व्हावी म्हणून उत्तेजन देत आहे.

दुसरे भाषण नाशिकमधील ऐतिहासिक सरकारवाड्या समोर झाले. विषय होता स्वराज्य. स्वराज्य म्हणजे काय व ते कसे मिळवायचे ते स्पष्ट करून श्री अरविंदांनी महाराष्ट्राच्या इतिहासाकडे बोट दाखवून मराठी माणसाला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रेरणा दिली. या भाषणात ते म्हणाले – ''तुम्ही शूर शिपाई होता. स्वराज्याचा उपभोग घेत होता. तुमच्या महाराष्ट्रात जेव्हा मुस्लिमांचा जुलूम होत होता तेव्हा परमेश्वरी प्रेरणेने रामदासादी सत्पुरुष निर्माण होऊन त्यांनी परमेश्वरी आज्ञेचा प्रसार आपल्या प्रासादिक वाणीने साऱ्या महाराष्ट्रात केला. सारा महाराष्ट्र जागृत झाला. परमेश्वराने भगवद्गीतेत् दिलेल्या वचनाप्रमाणे शिवाजी महाराजांच्या रूपाने अवतार घेऊन दुष्टांपासून देशाचे रक्षण केले. देश स्वतंत्र झाला. आज तीच परिस्थिती आहे. आजची चळवळ ही परमेश्वरी आज्ञा आहे. सत्याकरता व आपल्या हक्कासाठी आपण सारे एक झालो. तर प्रचंड झंझावाताने राखेचा पर्वत जसा नाहीसा होतो तद्वत ही परकीय सत्ता नाहीशी होईल. आपल्या प्रत्येकाच्या शरीरात ईश्वरी अंश आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत विखुरलेल हे तेज एकवटलं तर वेदांत वर्णन केल्याप्रमाणे विराट पुरुषाचे तेजःपुंज स्वरूप उभे राहील आणि मग १०/२० वर्षांत आपण आपले अंतिम साध्य 'स्वराज्य' हे खात्रीने मिळावू.'' अशा तऱ्हेने भारतीय संस्कृती आणि इतिहास यांना जागृत करून श्री अरविंद समाजाला स्वातंत्र्यलढा देण्यासाठी प्रेरित करत होते. नाशिकनंतर ते पुढे अकोल्यास गेले व तेथून कलकत्त्यास रवाना झाले.

बडोद्यास असताना श्री अरविंदांनी मराठी भाषेचा संस्कृतीचा आणि विशेषताः महाराष्ट्राच्या देदिप्यमान इतिहासाचा अभ्यास केला होता. समर्थ रामदासस्वामी व संत तुकाराम यांच्या कांही साहित्याचंही त्यांनी अवलोकन केल होतं. 'भारतीय संस्कृतीचा पाया' या ग्रंथात ते म्हणतात – ''मराठी वैष्णव कवितेत आरंभापासून बुद्धिप्रधान विचार मोठ्या प्रमाणावर आहे. रामदास हे भक्त, योगी व तत्त्वज्ञ होते. रामदासांची कविता मराठी राष्ट्रांच्या जन्माशी, जागृतीशी जोडलेली आहे. या कवितेत धार्मिक व नैतिक विचारांचा प्रवाह सारखा वाहताना दिसतो. तुकारामाची कविता भक्तीने भरलेल्या हृदयांतून निघाली आहे. तुकारामाच्या भक्तिमय हृदयातून निघालेला विचार मर्मज्ञ सत्यानें भरलेला आहे.

**शिवाजी महाराज आणि बाजी प्रभू देशपांडे :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन, चारित्र्य व कार्य याविषयी श्री अरविंदांना असणारा आदर आपणाला त्यांच्या लिखाणातून जाणवतो. त्यांच्या कार्याविषयी ते म्हणतात ''शिवाजी महाराजांचे जीवन व चारित्र्य नजरेत भरण्यासारखे आकर्षक होते. त्यांनी केवळ राज्य स्थापिले एवढेच नव्हे तर राष्ट्रसंघटनाही केली.'' शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक कसोटीचे क्षण श्री अरविंदांनी बारकाईने टिपले होते. पण विशेष म्हणजे

अशा कसोटीच्या क्षणी तानाजी मालुसरे, बाजी प्रभू देशपांडे वगैरेंनी दाखवलेलं शौर्य आणि देशनिष्ठा त्यांना कौतुकास्पद वाटली. अशा प्रकारची गुणसंपदा असलेली माणसंच राष्ट्रकार्य पुढे नेत असतात. आणि म्हणून अशी माणसं पुन: पुन: समाजात निर्माण व्हायची असतील तर मुळात समाजाने अशा गुणांची चहा करणे आवश्यक आहे. अशा गुणवंतानाही मानाचं स्थान द्यायला हवं अशा प्रकारच्या भावनांनी आणि विचारांनी प्ररित होऊन-



**छत्रपती शिवाजी महाराज**

श्री अरविंदांनी बाजी प्रभू देशपांडेच्या शौर्यकथेवर अत्यंत प्रभावी भाषेत ५०० ओळींची एक दीर्घ कविता लिहिली, बाजी प्रभूला, त्यांच्या शौर्याला, आणि देशनिष्ठेला श्री अरविंदांनी इंग्रजी भाषेत अमरत्वाच स्थान प्राप्त करून दिलं. त्या तेजस्वी काव्यातील शब्दसामर्थ्याची ओळख श्री शिवाजी सावंतानी एका लेखांत करून दिली आहे. पावनखिंड लढवण्याच कार्य आपल्या शिरावर घेताना तानाजीला उद्देशून बाजीप्रभू म्हणतात -



**बाजी प्रभू देशपांडे**

''हा रक्तामांसाचा सापळा कधीच लढत नसतो. त्याच्यातील चंचल मन, तेही कधीच लढत नसते. तर ब्राह्मणापासून कुत्र्यापर्यंत सर्वांना समाज मानणारं त्याच्यांत जे दैवी तेज असतं ते लढत असतं. केवळ माणसे मोठेपणा मिळवू शकत नाहीत. बाजी काय, तानाजी काय या फक्त नावाच्या खोळी आहेत. सर्वांना घेऊन फक्त ती माय भवानी उभी आहे. आपण तिने नेमलेले फक्त पाईक आहोत ती भवानीच फक्त वादळात आणि वज्राघातांत राखण्यास समर्थ आहे.

महाराज! मला फक्त ५० धारकरी दिलेत तरी खिंड लढवीन. आपण बिनधास्त विशाळगडावर जा. खुणेसाठी पोहोचल्यावर तोफांचे ५ बार लावा. साक्षात् मरणालाही तोवर खिंड ओलांडू देणार नाही.''

काव्याचा शेवट अत्यंत हृदयस्पर्शी आहे. महाराज व तानाजी बाजीच्या निष्प्राण देहाजवळ येतात. तानाजी म्हणतो - ''बाजी! ३३ महाद्वारांनी तुम्ही आज स्वर्गांत प्रवेश केलात. जेव्हा वेळ येईल तेव्हा या तानाजीलाही मातृभूमीच्या रक्षणासाठी एखादा किल्ला सर करताना असेच वीरमरण येऊ द्या असा आशीर्वाद द्या.''

महाराजांनी आपलं जरीकाठी पागोटं बाजीच्या मस्तकावर चढवलं आणि ते एकटक पाहू लागले. त्या

पागोट्याचा सोनेरी मुकुट झालेला त्यांना स्पष्ट दिसत होता.

**लोकमान्य टिळक –**

स्वातंत्र्य लढ्याच्या निमित्तानं श्री अरविंदांचा लो. टिळकांशी संबंध आला. दोघांनाही एकमेकामध्ये समविचार आढळला. भारतमातेला मुक्त करण्याची दोघांनाही तळमळ लागून राहिली होती. दोघेही आपापल्या परीनं काँग्रेसच्या मवाळ, बोटचेप्या धोरणावर आणि नेतृत्वावर प्रहार करत होते. स्वराज्य कल्पनेचा स्पष्ट शब्दांत उद्घोष करण्याच काम या दोघानींही सुरू केलं आणि सर्वसामान्य माणसांमध्येही स्वातंत्र्याची भावना रूजवून देशात चैतन्य निर्माण केलं. लोकमान्य टिळकांबद्दल श्री अरविंदांच्या मनात जी आत्मीयता होती, जो आदरभाव होता, तिचं प्रत्यंतर त्यांच्या लिखाणात आढळतं. टिळकांच्या विद्वतेचा गौरव करताना ते म्हणतात – "He is a great Sanskrit Scholar, a powerful writer, and a strong, subtle and lucid thinker." लोकमान्यांच जीवन म्हणजे, कोणत्याही प्रसंगात न डगमगता संघर्षास तयार असणारी जबरदस्त इच्छाशक्ती आणि अंगीकृत कार्याच्या सिद्धतेसाठी समर्पण करण्याची वृत्ती. लोकमान्यांनी अशा पद्धतीनं कार्याला दिशा दिली की संपूर्ण चळवळीचं भारतीकरण तर झालंच पण शिवाय संपूर्ण समाज स्वातंत्र्यचळवळींत ओढला गेला. असे प्रतिपादन करून श्री अरविंद म्हणतात "He was the God-given captain of the National aspiration."

मला वाटतं यापेक्षा लोकमान्याचा आणखी मोठा गौरव दुसरा कोणता असणार?

छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक आणि कदाचित त्या काळातील अथवा त्या पूर्वीच्या इतरही काही मराठी नेतृत्वाला डोळ्यासमोर ठेवून



**लोकमान्य टिळक**

श्री अरविंदांनी मराठी वंशाचं, मराठी बाण्याचं जे कौतुकात्मक वर्णन केल आहे त्यावरून त्यांच्या मनांतील महाराष्ट्राविषयी वसणाऱ्या भावनांचं दर्शन होतं. मात्र ते त्यांच्याच शब्दात वाचायला हवं.

**मराठी माणूस आणि त्याचा स्वभावधर्म :**

"The Manatha Race as their soil and history have made them are -

- a rugged, strong and sturdy people,
- democratic in their every fibre,
- keenly intelligent & practical to the very marrow
- following in ideas, even in poetry, philosophy and religion, the drive towards life & action
- Capable of great fervour, feeling and enthusiasm like all Indian peoples but not emotional idealists

- having in their thought and speach always a turn for strength, sense, accuracy, lucidity and vigour
- in learning and scholorship, patient, careful, industrious, thorough and penetrating
- in life simple, hardy and frugal
- in their temparament courageous, paugnacious full of spirit yet with a tact in dealing with hard facts & cirumventing abstacles
- shrewd yet aggressive diplomats
- born politicians
- born fighters

मराठी बाणा, महाराष्ट्राचा इतिहास आणि महाराष्ट्रानं केलेलं देशकार्य या सर्व गोष्टी श्री अरविंद किती जाणत होते ते वरील परिच्छेदांवरून आपल्या ध्यानात येतं. मात्र अरविंदांचे हे सर्व विचार त्या प्रमाणात मराठी माणसापर्यंत पोहोचलेले आढळत नाहीत. श्री अरविंद प्रथम स्वातंत्र्यलढ्यात होते. आणि नंतर योगी झाले. कदाचित स्वातंत्र्यलढ्यांत नेहमीच अग्रभागी राहिलेल्या मराठी मनाला त्यांच्यासारख्या तरुण तडफदार सेनानीनं असं मधेच लढ्याला रामराम ठोकून योगसाधनेकडे वळावं हे रुचलं नसावं. त्या निर्णयामागील कारणमीमांसा जाणून घेण्याची इच्छाही झाली नसावी. शिवाय एखादा माणूस जेव्हा योगी होतो तेव्हा त्याचा सर्वसामान्य जीवनाशी आणि तेथील प्रश्नांशी संबंध तुटतो ही आमची पारंपारिक कल्पना आणि त्यामुळे श्री अरविंदांचा योग, त्याचं स्वरूप, त्याचा उद्देश याकडे आम्ही फारसं लक्ष पुरवलं नाही. श्री अरविंदांनी प्रतिपादन केलेल्या पूर्णयोगाची जीवनाभिमुखता जाणवली नाही. आणि जीवनाच्या विविध बाजूंवर त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा स्पर्श जाणवला नाही.

महाराष्ट्र राज्य निर्मितीला ६० वर्ष होत आहेत. महाराष्ट्राला जाणून घेण्याची प्रकिया सर्व पातळ्यांवर सुरू आहे आणि म्हणूनच अधुनिक काळांतील एका महायोग्याचा १०० वर्षापूर्वी मराठी माणसाशी कसा संबंध आला व त्यायोगे महाराष्ट्राच्या इतिहासाचं मराठी संतांनी केलेल्या कार्याचं आणि मराठी बाण्याचं त्याना जे दर्शन घडलं त्याचा वृत्तांत आपणाला गौरवास्पद वाटेल. ती वृत्ती आज आपण किती टिकवून आहोत त्यावर विचार करता येईल आणि कदाचित त्या थोर महायोग्याविषयीही आत्मीयता निर्माण होऊन त्यांच्या विचारांचाही अभ्यास करावा अशी इच्छा निर्माण होईल.

**संदर्भ** : १) Shri Aurobindo in Baroda

२) 'संजीवन' त्रैमासिक, पाँडिचेरी

**नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी,१०१, सी. १
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी : २५३३३१६०
email : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## आवळ्याबद्दल थोडे

आवळा वाळवला की उरलेल्या गरात ७०-७५ टक्के कर्बोदके, ४-६ टक्के क्षार (कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, झिंक, सोडियम इ.) असे शरीराला उपयुक्त घटकांचे प्रमाण शिल्लक राहते.

संकलित

# कालाय तस्मै नमः

*लोकसत्ता दैनिकाच्या चतुरंग पुरवणीतील एक लेख वाचून मनात आलेले विचार या लेखात आहेत. सौ. देशमुख यांनी इ मेल करून पाठवलेल्या या विचारांवरील हा लेख दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत. एखादा लेख वाचून काही विचार आपणही लिहून पाठवले, तर त्यांचा दिशासाठी नक्की विचार होईल – संपादक*

चतुरंग पुरवणीतील 'पण मी बोलणार आहे' या सदरामधील मंगला गोडबोले यांचा 'ऐ जिंदगी' हा लेख वाचताना ती एक आजच्या तरुण पिढीची कहाणी आहे असे वाटले. या लेखात त्यांनी आजची तरुण पिढी त्यांच्या पुढील आयुष्याचे लहानपणापासून कसे अचूक व्यवस्थापन करते, निर्णय घेते आणि हे करणे मानसशास्त्रीय दृष्ट्या चूक की बरोबर याबाबत त्यांची मते मांडली आहेत. हा खरोखरच एक विचार करायला लावणारा असा लेख आहे. या लेखातील विचारांवर केलेले हे चिंतन.

या मुद्‌द्याचा विचार करताना मानसशास्त्राची एक विद्यार्थीनी आणि परदेशातील विभक्त कुटुंबाची प्रतिनिधी म्हणून बरेच विचारतरंग माझ्या मनात येतात. मानसशास्त्रात कोणत्याही समस्येचा तोडगा हा समुपदेशकाबरोबर बोलून सहज सोपा करता येतो. या वेळेला समुपदेशकालादेखील समस्येचे सगळ्या बाजूंनी व्यवस्थापन करावे लागते. समस्येचा प्रकार, तिचा त्या व्यक्तीवर झालेला परिणाम त्या व्यक्तीबरोबरच आजूबाजूच्या घटकांवर झालेला परिणाम, तिची तीव्रता, त्यात झालेली सगळ्यांची शारीरिक आणि मानसिक हानी असे अनके कंगोरे येणारी समस्या बरोबर घेऊन येत असते. सगळ्यांनाच या मुद्‌द्यांचा विचार करता येतो असे नाही. ज्याला हे जमते तो समस्येवर व्यवस्थित तोडगा काढतो. त्याचे योग्य पद्धतीने नियोजन करतो आणि आयुष्यातील कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी तयार होतो. हे करताना त्याला त्याची बुद्धिमत्ता जीवनातील गत अनुभव आणि नियोजनाची सवय या गोष्टी मदत करतात. त्यामुळे जरी आजच्या तरुण पिढीचे आयुष्य हे नियोजन करण्यात आणि योजलेल्या गोष्टी मिळवण्यात जात असले तरी, हा काळाचा महिमा आहे असे मला वाटते.

पूर्वीच्या काळातदेखील कुटुंबात म्हणा नोकरी व्यवसायात म्हणा, माणसांना समस्या भेडसावत होत्याच. पण त्यांचा ताण त्या एकटच्या व्यक्तीवर नव्हता. कुटुंबातील लहान थोरांपासून सगळे त्या व्यक्तीला मदत करत होते. 'विश्वास' या भक्कम फळीवर सगळे उभे होते. आता विभक्त कुटुंबामुळे कोणताही प्रश्न फक्त एक किंवा दोघा व्यक्तींनी सोडवायचा असतो. स्पर्धेला तोंड द्यायचे असते. परदेशातील वास्तव्य असेल तर तेथील वेगळे प्रश्न, नोकरीचे ताण, अनिश्चितता, नोकरीत टिकण्याची स्पर्धा, मुलांचे संगोपन, स्वत:चे करिअर, पैशांची बचत या सगळ्या गोष्टी नियोजनाविना केवळ अशक्य होतात.

अगदी दिवसाची सुरुवात होते तीच वेळेच्या नियोजनाने आणि जर तसे केले नाही तर त्याची सजा मिळते ऑफिसमधील लेट मार्कने. कितीही नाही म्हटले, तरी प्रत्येकालाच वेळेचे आणि काळाचे भान ठेवावे लागते. ह्या सगळ्या वेळा जपण्याचा ताण प्रत्येकावर असतो. आणि हा ताण हलका करायचा असेल तर वेळेच्या नियोजनाला पर्याय नसतो. अगदी लहान

मुलेदेखील घड्याळ्याच्या तावडीतून सुटत नाहीत. ऊन असो, पाऊस असो, थंडी असो, शाळेच्या वेळा, क्लासेसच्या वेळा, अभ्यासाच्या वेळा या सगळ्या चरकातून त्यांना जावे लागते.

बिचारे मूल या कालचक्रात भरडले जाते. यातूनच त्याला त्याच्या आयुष्याच्या नियोजनाकडे बघण्याचे बाळकडू मिळते. आणि मग त्याची स्वत:बरोबर आणि इतरांबरोबर स्पर्धेत टिकण्याची धडपड सुरु होते. स्वत:ची मते स्वत:चे विचार असलेले असे वेगळे व्यक्तिमत्त्व घडते. शिक्षणाची दिशा मग ती ठरावीकच का? याबाबत त्यांची कारणमीमांसा पक्की होत जाते. करिअर झाले की मग नोकरी, मग लग्न संसार कुटुंब या सगळ्या आघाड्यांवर तो किंवा ती स्वत:चे निर्णय घेण्यास सज्ज होतात. पण त्या निर्णयाचा चांगला किंवा वाईट परिणाम मात्र भक्कम संस्कारांचे पाठबळ आणि सद्सद्विवेकबुद्धीची साथ असलेली मुलेच पेलू शकतात.



त्यामुळे मागील पिढीने दिलेले संस्कारांचे ऋण त्याच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करून देते व हेच ऋण कुठेतरी पुढच्या पिढीत संक्रमित करायचे प्रयत्न आजची पिढी करताना दिसते. हे करताना मागच्या पिढीने संस्कारांचे काही नियोजन केले नव्हते. किंवा आज जसे गल्लोगल्ली संस्कारवर्ग दिसतात तसेही त्या काळात नव्हते. आजी आजोबा किंवा आईबरोबर तिन्हीसांजेला नियमित शुभंकरोती म्हणण्याची सवय होती घरात, जी आमच्या पिढीत आली. नियमितपणा प्रामाणिकपणा हे गुण रक्तात होते. हा झाला पिढ्यांमधील बदल.

पूर्वी इतर व्यवधानेही कमी होती. आजच्या इतके व्यत्यय नव्हते. संगणक नाही, आय पॉड नही, व्हिडिओ गेम नाही, पर्सनल लॅप टॉप नाही, भरमसाठ क्लासेस नाहीत, फेसबुक ट्विटर किंवा ऑर्कूट नाही, काही काही नाही. आता या वाढलेल्या साधनांमुळे व एखाद्या शब्दावर गुगल केल्यावर मिळणाऱ्या माहितीच्या महापुरात अगदी छोट्या छोट्या गोष्टींचे देखील नियोजन करावे लागते. अगदी वाचायचे का किती, काय इथपासून ते टी. व्ही. वर कोणता कार्यक्रम बघायचा तो का व किती वेळ इथपर्यंत सगळ्यांचा विचार करावा लागतो. या विचारांमध्ये आपण करतोय ते बरोबर की नाही याचा विचार करायला मात्र वेळ नसतो. शेवटी सगळ्यांना जीवनाच्या प्रवाहाबरोबर वाहत जायचे असते. प्रवाहाविरुद्ध पोहायचे सामर्थ्य प्रत्येकात असतेच असे नाही. त्यामुळे जीवनात येतील तसे अनुभव घेण्यापेक्षा आजची पिढी ठरावीक अनुभवांचे चाकोरीबद्ध एकसुरी जीवन जगत आहे असे काहीसे वाटते. कालाय तस्मै नम: आणखी काय!

**सौ. मानसी सलिल देशमुख**
रॅले, नॉर्थ कॅरोलिना,
अमेरिका

●●●

# संन्यास

*केकावलीचा संदर्भ घेऊन संन्यासाबद्दल विचार मांडणारा लेख- संपादक*

संन्यासी म्हटले की, आपल्यासमोर एकच चित्र उभे रहाते ते म्हणजे दाढी, केस वाढलेली आणि भगवे वस्त्र परिधान केलेली व्यक्ती. परंतु केवळ दाढी, केस वाढवली आणि भगवे वस्त्र परिधान केले, म्हणजे अशा व्यक्तीला संन्यासी म्हणता येते का? संन्यास घेणे एवढी सोपी गोष्ट आहे का? गीतेच्या सहाव्या आध्यायामध्ये संन्यासी कसा असावा हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे. ''कर्मफलावरील आसक्ती सोडून जो कर्तव्यकर्म करतो, तोच खरा संन्यासी होय.'' परमात्म्याच्या चिंतनात त्याचा सर्व वेळ जातो आणि ऐहिक वस्तूंचा त्यांनी चांगल्या रीतीने त्याग केलेला असतो म्हणून त्यांना संन्यासी म्हणता येत नाही; तर संन्याशाचे गुणधर्म त्याच्या अंगी असावे लागतात. संन्यास घेणे सोपी गोष्ट नाही; खूप कठीण काम आहे. संन्यास धर्माचे पालन करीत असताना थोडा जरी पाय घसरला तरी उंच शिखरावरून खाली पाथ्याशी पडून आगदी चेंदामेंदा झाल्यासारखे असते. संन्यास धर्माचे पालन करीत असताना पदोपदी आपण जातीभेदामध्ये अडकलो आहे किंवा नाही हे वारंवार तपासून पहावे लागते.

**खऱ्या संन्याशाची कर्तव्ये :**

१) संन्यास घेणाऱ्याने सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे.

२) स्वतःच्या सुखाची थोडीही कल्पना मनात येऊ देऊ नये.

३) कीर्ती, धन, वैभव मानसन्मान यांचा अभिमान मनात बाळगू नये.

४) आपला जन्म स्वतःच्या मुक्तीकरता नसून तो स्वतःची मुक्ती साधून लोकांना सुखी, समाधानी करण्यासाठी असतो हे लक्षात ठेवावे.

५) दुसऱ्याच्या कल्याणासाठी प्रसंगी स्वतःचा बळी देण्याची तयारी असावी लागते.

६) त्यांनी नेहमी जनकल्याणातच गुंतलेले असावे.

७) दुःखी प्राण्याचे दुखः दूर करण्यासाठी पडेल ते काम करण्याची त्यांची तयारी असावी.

८) आत्मचिंतन करून व त्या आत्मज्ञानाचा उपयोग करून जगाला पवित्र करण्याचा अधिकार संन्यासाचा असतो.

९) पतीसाठी शोक करण्याऱ्या विधवेचे आश्रू पुसणे, पुत्रप्रेमासाठी भगीनीचे सांत्वन करणे, आज्ञानी लोकांना जीवनाचा खरा मार्ग दाखवणे.

१०) झोपलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश टाकून जागे करणे आणि त्यांना स्वालंबी जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणे.

वरील सर्व प्रकारची कर्तव्ये पाहिल्यानंतर संन्यास घेणे किती कठीण गोष्ट आहे हे आपल्या लक्षात येईल.

**संन्याशाची लक्षणे :**

संन्याशाची मुख्य तीन लक्षणे पुढीलप्रमाणे दिसून येतात.

१) लोकेषणा

बळजबरीने कोणतीही गोष्ट साधत नाही.

२) पुत्रेषणा

३) वित्तेषणा

१) <u>लोकेषणा</u> – लोकेषणा म्हणजे रहाते ठिकाण होय. व्यक्ती ज्या ठिकाणी रहाते त्या ठिकाणी ती मान, सन्मान, प्रतिष्ठा यांना खूप महत्त्व देत आसते. मला सर्वांनी मान दिला पाहिजे, सन्मानाने वागवले पाहिजे आशी भावना तिच्या मनात निर्माण झालेली आसते. म्हणून ज्या ठिकाणी व्यक्ती रहाते त्या ठिकाणी राहून संन्यास घेता येत नाही. त्यांनी आपले रहाते ठिकाण सोडून दूर निघून गेले पाहिजे. राहाते ठिकाण सोडून दूर गेल्यानंतर इतरांनी आपला कितीही अपमान केला तर तो सहन करण्याची क्षमता वाढते. दूर गेल्यानंतर माणसांच्या मनातील मान, प्रतिष्ठा, अहंकार सर्वकाही लोप पावते. म्हणून संन्यास घेण्याऱ्या व्यक्तीने रहाण्याचे ठिकाण प्रथम सोडायला हवे. हे विश्वची माझे घर समजून राहिले पाहिजे.

२) <u>पुत्रेषणा</u> – पुत्रेषणा म्हणजे पुत्रप्रेम. ज्या व्यक्तीला संन्यास घ्यायचा आसेल त्या व्यक्तीने सर्वप्रथम पुत्रप्रेम सोडायला हवे. आपल्या दृद्धापकाळात आपणास आधार हवा, कोणीतरी पालनपोषण करणारा असावा, आपला वंश पुढे रहावा या सर्व संकल्पना त्यांनी सोडून द्यायला हव्यात. एवढेच नाहीतर त्यानी सर्व नातीगोती सोडून द्यावीत. कारण नात्याच्या मोहात आडकल्यानंतर संन्यास घेता येत नसतो. म्हणून सन्यास घेण्यास व्यक्तीने नात्याच्या मोहजाळ्यातून बाहेर पडायला हवे

३) <u>वित्तेषणा</u>– वित्तेषणा म्हणजे धनाचा संन्यास. संन्यास घेणाऱ्या व्यक्तीने धनाच्या लोभापासून दूर राहिले पाहिजे. धन जमा केल्यास त्याचा मोह आवरत नाही. म्हणून त्यांनी सर्व संपत्तीचा त्याग केला पाहिजे. संन्याशाने दररोज भिक्षा मागूनच अन्न ग्रहन करावे. रोज सकाळी पाच घरी जाऊन भिक्षा मागावी आणि जेवढी भिक्षा मिळेल त्या भिक्षेवरच दिवस काढायला हवा. चविष्ट भोजनाचा मोह संन्याशाने टाळावा. जेवढे आणि जसे अन्न असेल त्यावरच दिवस काढावा. त्यांनी संध्याकाळच्या जेवणाची अपेक्षा धरू नये. अन्नाचा संग्रह करू नये. जर एखाद्या दिवशी भिक्षा मिळाली नाही तर मनात राग न धरता तो संपूर्ण दिवस उपाशी रहावे. एखाद्यावेळेस भिक्षेपोटी उष्टे/ शिळे अन्न मिळाले तरी ते आवडीने खाण्याची तयारी हवी. म्हणजेच धनाच्या मोहात न अडकता दररोज मिळेल त्या भिक्षेवरच आयुष्य घालवले पाहिजे. थोडक्यात, वरील सर्व गोष्टींचा त्याग करून भिक्षावृत्तीने राहाणारा खरा संन्यासी होय. त्यासाठी चित्तशुद्धी करून घेऊन आशा आसूया, अहंकार, ईर्षा, यांना जाळून मगच संन्यास धारण करण्यास व्यक्ती पात्र किंवा ठरू शकते.

**संन्याशाचे प्रकार :**

उपनिषदामध्ये संन्यासाचे एकूण चार प्रकार सांगितले आहेत ते चार प्रकार म्हणजे वैराग्य संन्यासी, ज्ञान संन्यासी, ज्ञानवैराग्य संन्यासी आणि कर्म संन्यासी.

१) <u>वैराग्य संन्यासी</u> – पाहिलेले आणि ऐकलेले या विषयाबद्दल वैराग्य प्राप्त होऊन ज्याने संन्यास घेतला तो वैराग्यसंन्यासी होय.

२) <u>ज्ञान संन्यासी</u> – शास्त्रात सांगितलेले स्वर्गातील व नरकातील अनुभव ऐकून प्रपंचातून उपरत होऊन, देहवासना यांचा त्याग करून मनापासून संसार त्याज्य मानून जो संन्यास घेतो तो ज्ञान संन्यासी होय.

३) <u>ज्ञानवैराग्य संन्यासी</u> – क्रमाने सर्वांचा अभ्यास करून व अनुभव घेऊन ज्ञानवैराग्यांनी युक्त होऊन स्वरूपानुसंधानाने देहमात्रावशिष्ट होऊन सन्यास घेऊन जो अग्निधारण करतो तो ज्ञानवैराग्य संन्यासी होय.

४) <u>कर्म संन्यासी</u> – ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ या आश्रमांचे क्रमाने धारण करून वैराग्य प्राप्त झाले दनतानाही जो आश्रमक्रमानुसार संन्यास घेतो तो कर्म संन्यासी होय.

वरील सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केल्यास आपल्या लक्षात येईल की, संन्यास घेणे हे सर्वसामान्य माणसाचे काम नाही. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते, त्याग करावा लागतो. बरं, संन्यास घेण्याचा मूळ हेतू काय आसतो तर 'मुक्ती' मिळणे. मग मुक्ती ही सन्यास घेतल्यानंतरच मिळते का? संसारात राहून मुक्ती मिळत नाही का? मोह, माया अहंकार, त्याग इ. गोष्टींचा आपण त्याग केला असे कितीही सांगत असाल तरी कोणत्याही माणसाला या गोष्टी सुटू शकत नाहीत. माणसाला त्या घट्ट पकडून बसलेल्या दिसतात. या सर्व गोष्टींचा त्याग करायचा असेल तर एकच मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजे परमेश्वराचा सहवास. परमेश्वराच्या सहवासात राहूनच या गोष्टींचा त्याग हळूहळू करता येतो. जन्मताना आपण काहीही घेऊन येत नसतो. प्रपंचातील सर्व नाती ही क्षणभंगुर आसतात. मृत्यूनंतर आपण सोबत काहीही घेऊन जात नाही. यासर्वांची प्रचिती परमेश्वराच्या सान्निध्यात राहिलेल्याने होते. त्यासाठी संन्यास घेऊन घर,दार,प्रपंच,नाती सर्व सोडून जाण्याची गरज नसते. संसारात राहून परिवाराचे पालनपोषण करणे यात हानिकारक काहीच नसते. पण आपले मन मात्र ईश्वराजवळ ठेवले पाहिजे. ज्याप्रमाणे नाव पाण्यात राहिली तरी चालेल पण नावेत पाणी येता उपयोगाचे नाही अन्यथा नाव बुडून जाईल. त्याचप्रमाणे माणूस संसारात राहिला तरी चालेल पण माणसामध्ये संसार शिरता उपयोगाचे नाही. एका हाताने कर्मे करा आणि दुसऱ्या हाताने ईश्वराचे पाय घट्ट धरून ठेवा. संसारातील कर्मे संपली की लगेच दोन्ही हातांनी ईश्वराचे पाय धरा. यातच जीवनाचे खरे रहस्य आहे. जीवनाचा विकास साधायचा असेलं तर देवाची प्रार्थना करा सर्व आनंदमय होईल.

**संदर्भ** : मोरोपंतकृत 'केकावली', प्रका. पांडुरंग जावजी, मुंबई , पृ.४५१-४५५

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे
संपर्क - ९९३०१४८४४६

●●●

## जास्त पाणी पिण्याचे फायदे

- त्वचा चांगली होते.
- शरीरातली विषारी द्रव्यं निघून जातात.
- हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी होतो.
- सांधे आणि स्नायू यांना कुशन मिळतं, वंगण मिळतं आणि त्यांची हालचाल सहज होते.
- ऊर्जा प्राप्त होते, आपण सतत जागरूक राहतो.
- कामात नियमितता येते.
- वेगवेगळ्या प्रकारचे आजार आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.
- शरीराचं तापमान नियंत्रित राहतं.
- चरबी जाळली जाते आणि स्नायू बळकट होतात.
- फिटनेस वाढतो.

# साहित्य - जगत

प्रवीण कारखानीस उर्फ सुप्रसिद्ध 'भटकंती - फेम' प्रवीण कारखानीस (१९, गोकुळधाम सहनिवास, जागृत गल्ली, वडवली, अंबरनाथ - पूर्व जि. ठाणे - ४२१५०१) हा एक अवालिया आहे. १९७७ साली त्यांनी ठाणे-डोंबिवलीच्या आपल्या सात साथीदारांसह मुंबई ते रोम आणि परत मुंबई असा १५० दिवसांचा साडेबावीस हजार किलोमीटरचा प्रवास मोटार सायकलवरून पूर्ण करून एक विक्रम, प्रस्थापित केला. या साहसयात्रेवर त्यांनी 'अष्टचक्री रोमायण' हे रोमांचक अनुभव कथन करणारे सुंदर पुस्तक लिहिले ते १९८१ साली प्रसिद्ध झाले. त्याचा हिंदी अनुवाद 'मुंबई से रोम' मोटर साईकिलपर' प्रसिद्ध झाला. नंतर त्यांनी आफ्रिका खंडातील अनेक देशात, मोटार सायकलवरून, भ्रमंती केली. त्याचे पुस्तक झाले. 'भ्रमंती देशविदेशींची' त्याचाही हिंदी अनुवाद प्रसिद्ध झाला. नंतर त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, ब्रह्मदेश, बांगला देश श्रीलंका इ. देशांतून स्वच्छंद भटकंती केली. भारतातील अनेक प्रांतांतूनही ते मनमुराद फिरले. नोकरीनिमित्त त्यांचे सुमारे ५ वर्षे कलकत्ता येथे वास्तव्य होते. त्या काळात त्यांनी बंगाली साहित्य व संस्कृती यांचा मनमुराद आस्वाद घेतला. तेथील वास्तव्याचे रोचक वर्णन त्यांनी 'हावडा ब्रिजवरून' या पुस्तकात केले आहे. या पुस्तकास माननीय साहित्यिक / समीक्षक डॉ. अरुण टिकेकर यांची प्रस्तावना लाभली आहे. आणि म्हणूनच प्रसिद्ध क्रीडालेखक, क्रीडापत्रकार, द्वारकानाथ संझगिरी म्हणतात,

'प्रवीण कारखानीस ह्यांना देवानं अदृश्य चाकं आणि पंख लावूनच पृथीवर पाठवलं असावं. अन्यथा त्यांनी बँकेसारख्या डेबिट-क्रेडीटच्या बंदिस्त वातावरणात वावरत असताना जगभर अशी भरारी मारली नसती!

**मंजिल-ए-मक्सूद पाकिस्तान प्रकाशित :**

+ अशा या श्री. कारखानीसांचे नवे पुस्तक - 'मंजिल-ए-मक्सूद पाकिस्तान' (पृ. १६८, मूल्य रू १५०/-). ७.२.१० रोजी ठाणे येथील सहयोग मंदिरात सुप्रसिद्ध लेखिका प्रतिभा रानडे यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात प्रसिद्ध झाले. याप्रसंगी त्या म्हणाल्या, ''खेळाडू, कलाकार यांना सरहद्द नसावी. लोकांना शांतता हवी आहे. मात्र कोणत्या पद्धतीने हवी आहे हे कोणालाच कळत नाहीए. सौदी अरेबिया व अमेरिकेने पाकिस्तानला मदत थांबवली तर पाकिस्तानची अवस्था गंभीर होऊ शकते. पाकिस्तान हा नावाला देश आहे मात्र राष्ट्र म्हणून ते आता राहिलेले नाही. दहशतवाद पाकिस्तान मध्ये ज्या पद्धतीने फोफवत आहे ते पाहता त्याची वाटचाल अफगाणिस्थानच्या दिशेने होईल का अशी भीती वाटत आहे.''

दै. लोकसत्तेचे सहाय्यक संपादक अरविंद व्यं. गोखले आणि द्वारकानाथ संझगिरी या प्रकाशन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गोखले यांनी त्यांच्या पाकिस्तान भेटीचे अनुभव सांगितले. लष्करी राजवटीत पत्रकार म्हणून तेथे गेल्याने पाकिस्तान गुप्तचरांची, आयएसआयची आमच्यावर छपी नजर असायची. भारतातून आलेले आहे हे कळल्यावर तेथील जनता मनापासून आपले ठिकठिकाणी स्वागत करते. पाहुणचाराच्या बाबतीत पाकिस्तानी जनता खरंच अगत्यशील आहे. बेनझीर भुट्टो यांची झालेली भेट कराची विद्यापीठाच्या आवारातील लोकमान्य टिळक, गांधीजी यांचे काढून टाकलेले पुतळे कराची महापालिकेच्या गोदामात आपणास कसे सापडले याचे वर्णन त्यांनी केले.

द्वारकानाथ संझगिरी यांनी अनेकवेळा क्रिकेटच्या निमित्ताने पाकिस्तानचा दौरा केला. २००४ नंतर पाकिस्तानमधील परिस्थिती खराब होत चालल्याचे त्यांनी सांगितले. पाकिस्तानी जनता व सरकार यात फरक आहे. मेहमानवाजी काय असते हे तेथील जनतेकडून शिकण्यासारखे आहे असे ते म्हणाले.

सुरुवातीस नवचैतन्य प्रकाशना(न्यू गजांत को.ऑ.हौ.सो.लि.ब्लॉक नं. सी/११, तळमजला, कोसांम्गोनगर ल्फायओव्हर खाली, एस.व्ही. रोड, बोरिवली (प.) मुंबई - ४०००९२.) च्या शरद मराठे यांनी नवचैतन्य प्रकाशनाची माहिती दिली. पुस्तकाचे लेखक प्रवीण कारखानीस आपल्या मनोगतात म्हणाले,''आजचे तिन्ही वक्ते पाकिस्तानात जाऊन आलेले असून पाकिस्तानवरील त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत ही आनंदाची बाब आहे. २००४ साली क्रिकेटचे सामने पाहण्याच्या निमित्ताने आपण एकटेच पाकिस्तान गेलो, तेथील जनतेत मिसळून दौरा केला त्यावेळी आलेले अनुभव पुस्तकातून मी मांडलेले आहेत.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा आघाकर यांनी केले.

**मंजिल-ए-मक्सूद पाकिस्तान :**

कै. राम शेवाळकर यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे हे पुस्तकाचे वौशिष्ट्य आहे. ते म्हणतात, ''आपल्याला जो पाकिस्तानचा परिचय होतो तो वृत्तसंस्थांच्या माध्यमातूनच आणि तोही प्रामुख्याने राजकारणाच्या पातळीवरचाच होता. भारत आणि पाकिस्तान या दोन देशातील अंतराय व वैमनस्य वाढविण्यावरच अशा वार्तांचा कल असतो. पाकिस्तानचे आतापर्यंत झालेले सर्व सर्वाधिकारी व राजकारणी यांनीच त्यांच्या देशामध्ये भारतद्वेष अधिक वाढविण्याचे व विखारी करण्याचे कार्य सातत्याने चालविले आहे...''

राम शेवाळकरांनी कारखानीस यांचे भरघोस कौतुक केलेले आहे. सुप्रसिद्ध गीतकार व लेखक प्रवीण दवणे यांचाही पुरस्कार पुस्तकास लाभला आहे. रोमहर्षक व मनोरंजक माहिती पुस्तकात भरपूर असल्याने पुस्तक वाचनीय झाले आहे 'पाकिस्तानी जनतेच्या अंतरंगाचाही अकल्पित शोध लागला' हे शेवाळकरांचे शब्द कारखानीसांचे कर्तृत्व सिद्ध करतात. एक उत्तम पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल लेखक व प्रकाशकाचे अभिनंदन.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

जैविक प्रजातींमध्ये आपापसात सहकार्य करण्याची भावना उपजत असते. ही भावना उत्क्रांत कशी झाली हा एक स्वंतत्र अभ्यास विषय आहे. केंब्रिजच्या हार्वर्ड विद्यापीठामध्ये या विषयाचा प्रयोगशाळेत अभ्यास करून त्याबाबत प्रयोग करणारे विल्यम हरकोम्ब यांनी या अभ्यासासाठी इ-कोलाय या बॅक्टेरियाच्या प्रजातीवर आपले संशोधन केले आहे.

<u>संदर्भ</u> - 'नेचर' ११ मार्च २०१० (खंड ४६४) प्र. १४५


# जीवेत् शरदः शतम्!

*२९ एप्रिल हा आंतरराष्ट्रीय नृत्यदिन. दोन महिन्यापूर्वीच विख्यात नर्तिका सौ. मंजिरी देव यांनी वयाची साठ वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्ताने त्यांना शुभेच्छा देणारा लेख – संपादक*

१५ फेब्रु. १० रोजी वयाची साठ वर्षे यशस्वीपणे पूर्ण करून एकसष्टाव्या वर्षात आपण पदार्पण केलेत त्याबद्दल प्रथमतः आपले मनःपूर्वक अभिनंदन!

कथ्थक नृत्य क्षेत्रातील विशेष नावलौकिक असलेलं बुजूर्ग व्यक्तिमत्त्व म्हणून आपलं नाव ऐकलं होतं मात्र आपले पती आणि माझे स्नेही श्रीराम देव यांचेमुळे आपणाशी अधिक परिचय झाला. साठी निमित्ताने लागू कुटुंबियातर्फे आपणास हार्दिक शुभेच्छा पत्र देत आहे.

षष्ठ्यब्दी सोहळ्याचे औचित्य साधून वाढदिवशी होमहवन आणि धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. मात्र यानिमित्ताने कुटुंबीय, चाहते आणि आपले विद्यार्थी त्यांचे पालक यांनी आपणविषयी वाटणाऱ्या स्नेहभावनेतून आणि कृतज्ञतेपोटी शनिवार दि. २० फेब्रु. १० रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या पटांगणात लौकिक समारंभाचे आयोजन केले होते. सदरहू सोहळा अतिशय, हृद्य, मनोवेधक, रंगतदार, सुनियोजित आणि आकर्षक झाल्याचे वर्णन उपस्थितांपैकी अनेकांकडून समजले, वृत्तपत्रांतील यासंबंधीचा मजकूरही वाचला. याप्रसंगी नृत्यक्षेत्रांतील आशा जोगळेकर, राजकुमार केतकर अशा सारख्या मान्यवर व्यक्ती ह्यातर उपस्थित होत्याच; परंतु त्याच बरोबर योगाचार्य अण्णासाहेब व्यवहारे, प्रवीण दवणे, शशी व्यास, शशीकांत कोनकर, मान. आमदार राजन विचारे, एकनाथ शिंदे, माजी आमदार अनंत तरे यांच्यासारखी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि बुजूर्ग मंडळी तसेच आपले असंख्य विद्यार्थी, त्यांचे पालक आणि चाहते आपणास शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. या सर्वांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने पटांगण पूर्णपणे भरले होते; हे समजल्यावर मनस्वी आनंद झाला, समाधान वाटले. मात्र पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे या अभूतपूर्व सोहळ्याप्रसंगी मनात इच्छा असूनही उपस्थित राहता आले नाही याची रुखरुख वाटते असो,



कलावंत, कलाकारांची भूमी म्हणून ओळख आणि सुपरिचित असलेल्या कोल्हापूर कलानगरीमध्ये आपला जन्म व्हावा ही केवळ योगायोगाची गोष्ट नसून ईश्वरीसंकेत असणार यात शंका नाही. जवळ जवळ पाच दशके आपण कथ्थक नृत्यकलेची एकलव्याप्रमाणे साधना आणि सेवा करीत आहात. ज्या काळात समाजाचा एकूणच कलाक्षेत्राकडे त्यातही नृत्यकलेकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आणि पोषक वातावरणाचा नसताना किंबहुना दुर्लक्षित व हेटाळणीचा असून देखील 'करिअर' म्हणून आपल्या आई-वडिलांनी त्याची निवड केली आणि विशेष म्हणजे विवाहानंतरही सासरच्या मंडळीनी आपणाला प्रोत्साहन दिले आणि यामध्ये 'करिअर' करण्याची संधी दिली त्याबद्दल त्यासर्वांना द्यावे तेवढे धन्यवाद आणि करावे तेवढे अभिनंदन अपुरेच आहे. प्रचंड मेहनत, अखंड परिश्रम, चिकाटी, जिद्द आणि आत्माविश्वास या गुणांमुळे या क्षेत्रातील उत्तम शिखर आपण गाठलेत, स्वतःचं स्थान आणि

नावलौकिक निर्माण केलात. कथ्थक नृत्यशैलींतील डॉक्टरेट मिळविणाऱ्या कदाचित आपण एकमेवाद्वितिय विदुषी, कलाकार असाल. कला ही ईश्वरी देणगी आहे आणि कलाकार, कलावंताकडे ती जन्मजात असते. नृत्यकला हे जरी आपलं जीवनसाध्य आणि मूळ जीवन लक्ष असलं तरी नाट्य आणि सिनेक्षेत्राशीही आपला जवळचा संबध होता. प्रारंभीच्या काळात काही नाटकातून आणि सिनेमातून आपण साकार केलेल्या प्रमूख भूमिका गाजल्या होत्या. त्यामुळे बहुआयामी, बहुश्रुत व्यात्किमत्त्व असं जर आपणाला संबोधलं तर ते अधिक उचित ठरेल.

कथ्थक नृत्यशैलींतील अर्ध्वयु, अग्रणी आणि ज्यांना 'दीपस्तंभ' म्हणता येईल अशा गोपी कृष्णांसारखे अलौकिक गुरू आपणाला लाभले, त्यांच्याकडे नृत्याचे धडे घेतलेत, त्यांच्यासमवेत नृत्य करण्याची उत्तम संधी आपणाला मिळाली यासारखं थोर भाग्य नाही. आपल्या गुरुंविषयी वाटणाऱ्या कृतज्ञतेच्या आणि विलक्षण आदराच्या, आत्मीयतेच्या भावनेतून ठाणे शहरात गोपीकृष्ण महोत्सवाची सुरुवात आपण केलीत. आजच्या जमान्यात असं गुरु-शिष्यांचं नात जपणारी आणि जाणीव ठेवणारी कलाकार मंडळी केवळ अभावानेच मिळतील.

नृत्याविष्काराकडे एक करिअर आणि आवड म्हणून आपण पाहिलं असलं तरी त्यामुळे संसार, कुटुंब याकडे कधीच दुर्लक्ष केले नाहीत किंबहुना दोन्ही गोष्टींची उत्तम सांगड आपण घातलीत. गृहिणी या नात्याने गृहकर्तव्ये, पै-पाहुणा, सणवार, व्रतवैकल्य हे सर्व संभाळून नृत्यकलेची साधना आणि सेवा आपण केलीत ही विशेष उल्लेखनीय आणि अभिनंदनीय बाब आहे. वृत्ती सात्त्विक आणि धार्मिक, गजानन महाराज, साईबाबा, कोल्हापूरची महालक्ष्मी यांच्यावर आपली नितांत श्रद्धा आणि भक्ती आहे. त्यांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी सदैव आहेत. साईबाबांच्या पोथीमध्ये देव कुटुंबियांच्या पूर्वजांचा उल्लेख आढळतो. १९६८ साली वयाच्या केवळ अठराव्या वर्षी श्री. श्रीराम देव यांच्याशी आपला प्रेम विवाह झाला आणि 'मराठे' च्या 'देव' झालात.

कोमल वाचा देरे राम। बहुत पाठांतर देरे राम। नृत्य कला मज देरे राम।

संगीत - गायन देरे राम। आलाप गोडी देरे राम। शब्द मनोहर देरे राम।

अशा विविध कलागुणांचं मागणं श्री समर्थ रामदासांनी श्रीप्रभू रामचंद्राकडे केले आहे. आपल्या कुटुंबाकडे बघताना याची प्रचिती येते. एखादं घराणच कलाकाराचं कसं असतं हे आपल्या कुटुंबाकडे पाहिल्यानंतर लक्षात येईल. पति श्री. श्रीराम देव नाट्य आणि टी.व्ही. सिरिअल क्षेत्राशी संबधित, चिरंजीव पंडित मुकुंदराज देव ख्यातनाम तबला वादक, दुसरे चिरंजीव अभिजित देव यांचा कला स्टुडिओ आहे. स्नुषा मनाली नृत्याचे आणि तबल्याचे धडे आपल्या आई-वडिलांकडून घेत आहे. विविध कला क्षेत्राशी निगडित संपूर्ण कुटूंब असल्याचं अभावानेच आढळेल.

नृत्यकलेविषयी मी काही बोलावं इतका माझा अधिकार नाही अथवा अभ्यासही नाही. मात्र एक प्रेक्षक म्हणून नम्रपणे सांगावेसे वाटते की आजही आपण नृत्य साधना करीत असताना त्यातील नज़ाकत, अदाकारी लक्षात येते. या ठिकाणी सरोजखानची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. टी.व्ही. वर विद्यार्थ्यांना त्या नृत्यविष्कार शिकवीत असताना याची प्रचिती येते.

झी मराठी टी.व्ही. वरील सचिन सादर करीत असलेल्या 'एका पेक्षा एक' कार्यक्रमामुळे घराघरात आपण पोहोचल्या आहात. याचा अनुभव अंदमान सहलीमध्ये आम्हांला आला असल्याचं आपल्या

स्मरणात नक्कीच असेल. अनेक एपिसोडमध्ये महागुरुं समवेत नृत्यक्षेत्रांतील बुजूर्ग आणि प्रेक्षकांनी आपणांस पाहिल आहे. मात्र यावेळी कलाकारांना उत्तम मार्गदर्शन आणि मोलाच्या टीप्स' देताना प्रेक्षकांनी आपणास पाहिलं. आपल्या समवेत असणाऱ्या तरुण परीक्षकांना त्यांचा उत्साह वाढावा, आत्मविश्वास वाढावा या जाणिवेतून त्यांना मार्गदर्शन करण्याची अधिक संधी आपण देत असल्याचं आम्ही पाहिलं आहे आणि आपणाकडून ऐकलंही आहे. या ठिकाणी आपण दुय्यम भूमिका घेऊन उदयोन्मुख परीक्षकाला अधिक प्रसिद्धी आणि संधी मिळावी, त्याला प्रोत्साहन मिळावं ही आपली भावना लक्षात येते. या कार्यक्रमातून योग्य वेळ येताच आपणहून बाहेर पडलात.

आयुष्याच्या एका विशिष्ट टप्प्यावर आपण उभ्या आहात. 'ठाणेभूषण' सारखे अनेक पुरस्कार, मनासन्मान आपणास मिळाले; परंतु कुठेही अंहकाराचा, आत्मप्रौढीचा भाग नाही. बोलण्यातील मार्द्वता, आर्जवता, समोरील व्यक्तिविषयी आदरभाव, सदा हसतमुख आणि घरी आलेल्यांचं स्वागत करण्याचा स्वभाव हे गुण विशेष आपल्या बोलण्या - चालण्यातून, वागणुकीतून आणि कृतीतून लक्षात येतात हे स्वानुभवावरून नमूद करू इच्छितो.

गणेश कल्चरल ॲकॅडॅमी या सांस्कृतिक व कला क्षेत्राशी निगडित असलेल्या संस्थेच्या उभारणीत आणि वाटचालीत आपला सिंहाचा वाटा आहे. गेली २५ वर्षे ठाण्यांतील रसिकांना दर्जेदार आणि उत्तमोत्तम कार्यक्रम देण्याची आपल्या संस्थेची गैरवशाली परंपरा आहे. या व्यतिरिक्त ब्राह्मण शिक्षण मंडळ, मराठी ग्रंथ संग्रहालय, ब्राह्मण परस्पर साहय्यकारी पतपेढी या आणि अशा सारख्या अनेक सामाजिक संस्थांशी आपला संबंध आहे. सामाजिक बांधीलकीच्या जाणिवेतून अनेक संस्थांना आपण आर्थिक सहाय्य केले आहे.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी अनेक नृत्याचे कार्यक्रम आपण सादर केले आहेतच त्याचबरोबर परदेशातही ते करण्याची संधी आपणास प्राप्त झाली आहे. किंबहुना परदेशातील आपल्या शिष्या कार्यक्रमासाठी आपणास खास निमंत्रण पाठवितात. प्रवासाची आवड असून कार्यक्रमाचे निमित्ताने आणि सहलीच्या माध्यमातून आपण जवळ-जवळ संपूर्ण भारत दर्शन केले. युरोप, सिंगापूर, मॉरिशस, बँकॉक, पटाया अशा सारख्या देशातही आपण फिरला आहात.

भावी पिढीला कथ्थक नृत्याविषयी माहिती आणि आवड निर्माण व्हावी, मार्गदर्शन व्हावे या दृष्टीने आपण पुस्तक प्रकाशनही केले आहे. या क्षेत्रातील बुजूर्ग आणि ख्यातनाम नृत्यांगना श्रीमती रोहिणी भाटे यांच्या दुखःद निधनाची बातमी आपणास आदल्या दिवशी संध्याकाळी कळली आणि दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात त्यांच्यावर आपण लिहिलेला मृत्यूलेख वाचला त्यावेळी आपली लेखनप्रतिभा आणि लेखनाची हातोटी जाणवली. तसेच एखाद्या कार्यक्रामाचे निमित्ताने तयार केलेले निवेदन यावरूनही आपलं लेखन कौशल्य लक्षात येते. याबाबतीत आपणाशी तसे मी बोलूनही दाखविल्याचे माझे स्मरणात आहे. आपणासारख्या प्रतिथयश आणि मान्यवर कलाकारांनी नृत्यकलेला सामाजात प्रतिष्ठा आणि मानाचे स्थान मिळवून देण्यात मोलाची आणि महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हे सत्य मान्यच करावे लागेल. पालकांचा आणि एकूणच समाजाचा नृत्यकलेकडे बघण्याचा दृष्टिकोन आता बदलाल असून 'करिअर' आणि आवड म्हणूनही आपल्या मुलीला नृत्याला क्लासला ते आवडीने पाठवतात.

असो, सामान्य व्यक्तीच्या जीवनात साठीनंतर संसाराची, कुटुंबाची जबाबदारी हळूहळू मुलांनातावंडावर सोपवून वानप्रस्थाश्रमाकडे जातात. मात्र आपणाकडून हे

अपेक्षित नाही. नृत्य कलेत आपण अनेक शिष्यगण तयार केले आहेत आणि यापुढेही ते निर्माण करण्याची गरज आहे. नृत्य साधनेचं व्रत अखंड चालू राहण्यासाठी आपणास निरोगी, निरामय, सुखी आणि समाधानी दीर्घायुष्य लाभो ही नटेश्वर चरणी प्रार्थनी करतो आणि लागू कुटूंबियांतर्फे षष्ठ्यब्दी निमित्ताने पुनःश्च हार्दिक शुभेच्छा! आणि जीवेत् शरदः शतम्! अशा सदिच्छा व्यक्त करतो.

**श्री. सुरेंद्र लागू**
२ / पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे (प.)
दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

'द सायन्स ऑफ ओव्हन' (हर्व्ह धीस - कोलंबिया युनिव्हर्सिटी, २००९) पुस्तकामध्ये फ्रेंच रसायशास्त्रज्ञ हर्व्ह धीस यांनी मॉलिक्युलर गॅस्ट्रॉनॉमी, स्वयंपाकाचे विज्ञान या विषयांबाबत अतिशय महत्त्वाची निरीक्षणे नोंदली आहेत. एकाच प्रकारच्या पदार्थाच्या चवी वेगवेगळ्या का असतात, प्रत्येक घटक पदार्थाची चव विशिष्ट अशी का असते, एकच पदार्थ विविध प्रांतात वेगळा का लागतो, रासानिकदृष्ट्या त्याचे गुणधर्म सारखे असतात का इत्यादी विषयांवर या पुस्तकात माहितीपूर्ण विवेचन आहे.

<u>संदर्भ</u> - 'नेचर' १८ मार्च २०१० (खंड ४६४) पृ. ३५५

## तीन गोष्टी

- या तीन गोष्टी नेहमी कुणाची वाट पहात नाहीत - वेळ, मरण आणि गिऱ्हाईक
- या तीन गोष्टी जीवनात एकदाच भेटतात - आई, आयुष्य आणि तारुण्य
- या तीन गोष्टी कधीही विसरू नका - कर्ज, कर्तव्य आणि एखाद्याची कृपा
- या तीन गोष्टींचा सन्मान करावा - आई, वडील आणि गुरू
- या तीन गोष्टींवर संयम ठेवा - काम, क्रोध आणि लोभ
- या तीन गोष्टी नेहमी लक्षात ठेवा: यांच्यातून प्रगती होते - उद्योग, प्रयत्न आणि परमेश्वर
- या तीन गोष्टी एकदा निघून गेल्यावर परत येत नाहीत - धनुष्यातून गेलेला बाण, गेलेला शब्द आणि शरीरातून गेलेला प्राण

संकलित

# उपनिषदातील नीती विचार
## (लेखांक ५ वा)

*उपनिषदांवरील लेखमालेतील हा पुढील लेख – संपादक*

**नीतीने जीवन उंचावते :**

नीती आणि उपनिषद् विचार या दोहोंत परस्पर घनिष्ट संबंध आहेत. नीतीच्या नियमाचे काटेकोर पालन केल्याखेरीज अध्यात्म ज्ञानात प्रवेश होणे अशक्य. काही विचारवंत, ज्ञानी मंडळी असे म्हणताना आढळतात की ज्याने पूर्णत्व प्राप्त करून घेतले त्याला नीतीची गरज राहत नाही. कारण पूर्णत्वाला पोचलेल्या त्या ज्ञानी माणसाला पाप अगर पुण्य चिकटत नाही. हे पूर्णत्वाला पोचलेल्या मानवाच्या गौरवार्थ काढलेले उद्‌गार असतात. हे नीटपणे लक्षात ठेविले पाहिजे. अन्यथा गैरसमज होण्याचा संभव असतो. याचा अर्थ असा कधीही करून चालणार नाही की असा पूर्णत्वाला पोचलेला माणून स्वैरपणे वागला तरी चालेल. हे या मानवाच्या बाबतीत तरी अशक्यप्राय आहे. कारण पूर्णत्वाला पोचवण्यासाठीच त्याला साऱ्या हीन वासनांना सर्वप्रथम फाटा द्यावा लागतो. तो स्वैरपणे वागेल ही कल्पना चुकीची ठरेल. त्याचा आपल्या इंद्रियावरती पूर्ण ताबा असल्याने तो प्रेम व तिरस्कार यांच्या पलीकडे जाऊन सर्व गोष्टी पहात असतो व अनुभवत असतो. म्हणून त्याचे चित्त नेहमीच प्रसन्न राहाते. कारण मन आत्मतत्वावर अधिष्ठित झालेले असते. यालाच स्थितप्रज्ञ असे म्हणत असतात. गीतेत असे म्हटले आहे की – रागद्वेष वियुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश्वरन्। आत्मश्यैर्विधेयात्मा प्रसादं अधिगच्छति।

**द्विस्तरीय नीती :**

नीती वैयक्तिक आणि सामाजिक या दोनही स्तरांवर पाळणे आवश्यक आहे. वैयक्तिक स्तरावरील नीतीच्या आचरणाने त्या व्यक्तीची चित्तशुद्धी घडून येण्यास मदत होते. या प्रकारच्या विकसनातूनच सर्वोत्तम जीवनाचा पाया घातला जातो. अशा परिस्थितीत तो जीवनमूल्यांची जपणूक करु शकतो व त्याचे संवर्धनही त्याच्या हातून होत राहाते. वैयक्तिक विकसनाचा दृष्टिकोन श्रीमत् आद्यशंकराचार्य, रामानुजाचार्य, पतंजलीमुनि, तसेच बुद्धदेव अनेक संत मंडळी यांनी प्रतिपादलेला आहे, किंबहुना पुरस्कारलेला आहे. या सर्वांनीच एक मुखाने असे म्हटले आहे की सत्यता ही पापपुण्याच्या अतीत आहे. मन निर्मळ झाल्या खेरीज सत्यतेचा बोध होणे दुरापास्त. निर्मळ जीवनासाठी नीतीची कास धरणे आवश्यक.

सामाजिक नीतीच्या आचरणाने समाज कल्याण व समाज हित या दोनही गोष्टी साध्य तर होतातच शिवाय वृद्धिंगत पण होतात. ही नीती कर्तव्याच्या भूमिकेवर उभी आहे. यालाच धर्म असेही नाव आहे. कर्तव्याची निश्चित पद्धत धर्माने घालून दिलेली आहे. व्यक्तीचे गुणानुरूप समाजात निर्माण होणारे स्थान आणि तिची वयोमर्यादा या दोनही गोष्टी ध्यानात घेऊन तिचे कर्तव्य निश्चित करण्यात आलेले आहे. यामुळे व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या गुणांना पूर्ण वाव मिळून त्याच्या वयोनुरूप कर्तव्यपालनाची भूमिकाही तिला पार पाडता येते.

यालाच वर्णाश्रम धर्म पद्धती असेही म्हणतात. या शिवाय वैश्विक स्तरावरील सर्व साधारण धर्मही या सामाजिक नीतिमध्ये मोडतो. कारण इथे अखिल विश्वातील मानवाचा इतर गोष्टींशी व्यवहाराचा संबंध प्रस्थापित होत असतो. वास्तविक सामाजिक वा वैयक्तिक नीतिशास्त्र हे एक साधन मात्र आहे ते काही साध्य असू शकत नाही. या साऱ्या नीती नियमांच्या आचरणातून आत्मभाव आणि दैवी जीवन निर्माण करणे शक्य व्हावे एवढ्यासाठीच या दुहेरी नीतिनियमांचे पालन प्रत्येकालाच करणे अत्यंत आवश्यक आहे.

**उपनिषदातील नीती विचार :**

कोणतेही कर्म हितकारक आहे की नाही याचा निश्चय करताना ते कर्म त्यागावर किती प्रमाणात आधारित आहे या गोष्टीचा विचार प्रामुख्याने उपनिषदातून केलेला आढळतो. कर्माचे आचरण करताना, कर्त्याचे तप, त्याची त्याग बुद्धी या गोष्टी विचारात घेऊन त्याच्या कर्माची श्रेणी ठरविली जाते. याचबरोबर सामाजिक जीवनातील मूल्यांचाही विचार प्राधान्ये करून केला जात असे. कारण संपूर्ण जीवनच यज्ञमय आहे असे छांदोग्यात म्हटले आहे. या यशाची दक्षिणा काय असावी हे सांगत असताना त्यात असे म्हटले आहे - तपस्, सत्य, आर्जव, अहिंसा, सत् या गोष्टी प्रामुख्याने असाव्यात - पुरुको वाव यज्ञः। अथ यत् तपः दानं, आर्जवं, अहिनसा, सत्यवचनं इतिताः अस्य दक्षिणा। (छां. ३.१७) नारायणीय उपनिषदात म्हटले आहे की - यथा वृक्षस्थ संपुष्पितस्य दूरात् गंधोवाति पुण्यस्य कमरणो दूरात् गंधोवाति यथाऽसिधारां कर्तेवहि। प्रफुल्लित झालेल्या फुलझाडांवरील फुलांचा सुगंध जसा आसमंतात पसरत राहतो त्याचप्रमाणे पुण्यकर्माचा सुगंधही पसरतो हे एक असिधारा व्रत आहे. कठ उपनिषदात असे म्हटले आहे की सर्वप्रथम शिष्याच्या ठिकाणी असलेल्या दुष्टवासना नाहीशा कराव्यात आणि मगच त्याला आत्मज्ञान द्यावे. नाविरतः दुश्चारितात् न शान्तः ना समाहितः। ना शान्तमनसः वाणि प्रज्ञानेन एवं आप्नुयति्। (कठ - १-२-२३) तैत्तिराय उपनिषदात असे सांगितले आहे. वेदाध्ययन आणि वेदांची शिकवण यांना कर्तव्याची जोड दिली जाणे आवश्यक आहे. स्वाध्याय प्रवचने ऋत, सत्य, तपः,दमः, शमः, अग्नयः अग्निहोत्रं, अतिथय; मानुषं प्रज्ञा प्रजन प्रजापतिः - (तैत्रियल १.९) वरील विवेचनावरून थोडक्यात मानवाच्या ठिकाणी कर्तव्य पालनाची भूमिका निर्माण व्हावी, दुष्ट वासनांचा उपशम व्हावा याचाच विचार उपनिषदातून आढळतो. याच्याही पुढे जाऊन असे म्हणावेसे वाटते की दुष्टतेचा धिःकार सर्वांनीच एकमुखानी केलेला आहे. उपनिषदकाळी सर्व सामान्य माणूस कसा वागत होता हे छंदोग्याच्या एका उताऱ्यावरून ध्यानात येईल. राजा अश्वपती कैकेयी म्हणतो - माझ्या राज्यात चोरी होत नाही, कोणी अडाणी नाही, कोणी कंजूष नाही, कोणी मद्यपी नाही, यज्ञवेदी विरहित घर नाही; भेसळ करणारा कोणी नाही, स्वैर वर्तन करणारा कोणी नसल्याने स्वैरिणी कुठून असणार? तान् ह उवाच अश्वपतिः वै भगवतः अर्थ कैकेयः उवाच - न मे स्तेवः जनपदे, न कदर्यः न मद्यपःन अनाहिताग्निः न अविद्वान् न स्वैरी कुतः। (छा. ५.११.५)

**श्रेष्ठ जीवनाचा पाया :**

नीति शास्त्राप्रमाणे स्वयं आचरण हे व्यक्तीच्या मोक्षाला कारणीभूत होते असे गीतेत प्रतिपादन केले आहे. उद्धरेत् आत्मानात्मानं (गीता ६-५) तपस् व न्यास (संन्यास) या आचरणाच्या मुख्य गोष्टी होत. वेद काळा-पासून आजतागायत तपाचे महत्त्व सर्वांनीच मान्य केले आहे. याच मार्गाने ऋषि अतिश्रेष्ठ व दैवी शक्ती संपादित करते झाले. त्यांचे जीवन त्यामुळे श्रेष्ठ झाले. इतकेच नव्हे त्याही पलीकडचे स्थान - अक्षय ब्रह्मपद-प्राप्त करून घेते झाले. इंद्रिय जय आणि - मनाची एकाग्रता या

माध्यामातून त्यानी विश्वातील रहस्ये शोधून काढली. विश्वाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहिले आणि आपल्या ज्ञानाचा फार मोठा साठा अखिल मानवासाठी खुला करते झाले.

**अंतर्मनाचा ठाव :**

सृष्टी रचयिता प्रजापतीने बल प्राप्तीसाठी स्वतः तप आचरिले. या विश्वात जे जे काही श्रेष्ठ म्हणून आहे ते सारे काही तपामुळेच आहे याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. प्रजापतीने सर्वप्रथम चार व्यक्तींना जन्माला घातले ते चौघेही जन्मतःच तपश्चर्येला निघून गेले. हे पाहून प्रजापतीने एक युक्ती योजिली. संन्यस्त मंडळी विश्वाचे सातत्य टिकविण्यासाठी उपयुक्त ठरणार नाहीत हे पाहून आणखी काहीना जन्माला घालतेवेळी त्यांची वृत्ती बाह्य राहील हे बघितले (कठ २-१-१) या उपनिषदात असे म्हटले आहे की प्रजापतीने इंद्रियांची वृत्ती बहिमुर्ख केली - पराश्चिरवानि व्यतृण त् स्वयंभुः। त्यामुळे शरीरातील आत्मशक्ती ही बाह्य गोष्टीतच रममाण झाली. आणि जन्ममृत्यूच्या चक्रातच अडकली. ही प्रजापतीने योजिलेली युक्ती शांत वृत्तीच्या विचारशील मुनिजनानी ओळखली. त्यानी आपली इंद्रिये अंतर्मुख केली. व या संसार चक्रातून सुटका करून घेण्याचा मार्ग शोधून काढला. तपश्चर्या ब्रह्मज्ञानाचा झरा आहे हे त्यांच्या ध्यानात आले. तस्मै तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा वेदाः सर्वात्मनि सत्यं आयतनं (केन ४.८) व छां. (२.३३) ऋः धर्मस्कंधाः यज्ञः अध्ययनं दानं इति। प्रथमं तपः एव। मुंडकात असे म्हटले आहे की मायं आत्मा बलहीनेन लभ्यः न च प्रसादात् तपसः वादि अलिङगात्। एतैः उपायैः यतते यस्तु विद्वांसः तस्य एषः आत्मा विशते ब्रह्मधाम (२.३.४) मनोदौर्बलय असेल तर आत्मज्ञान होणार नाही, जो दक्ष नाही, जो प्रयत्नशील नाही त्याला केवळ संन्यस्त वृत्तीनेही ज्ञान होत नाही. या साऱ्या उपायांनी जो दक्ष व प्रयत्नशील राहील त्यालाच ब्रह्मापर्यंत पोचता येईल. श्रेयो हि धीरः अभिप्रेयसः वृणीते प्रेयः मन्दः योगक्षेमान् वृणीते। समजुतदार माणून कल्याण जवळ करतो असमंजस प्रेय जवळ करतो (कठ १-२) यावरून तपश्चर्या आवश्यक आहे हे ध्यानात येते. तपश्चर्येच्या योगाने मानव उच्च गोष्टी प्राप्त करून घेतो. 'तपसा प्राप्यते सत्यं सत्यात् संप्राप्यते मनः। मनसः प्राप्यते ह्यात्मा यं आप्त्वा न निवर्तते। (मैत्रायणी ४-३) तपश्चर्येनेच सत्याची प्राप्ती होते आणि तेथून पुढचा प्रवास सुरू होतो. मनुष्य सुख अपेक्षितो व शेवटची संधी घालवितो. फक्त मूर्ख माणसूच लोभामुळे व मत्सरांमुळे प्रेय जवळ करतो.

तपश्चर्या याचा अर्थ शारीरिक दंड व मानसिक कष्ट उगाच सहन करणे असे मात्र कुणी करू नये. इंद्रिये दुर्बल राहिली तर ती आध्यत्मिक ज्ञान प्राप्तीसाठी समर्थ होत नाहीत हे ओळखून तपात सामर्थ्य प्राप्त व्हावे यासाठी करण्यात येणारे प्रयत्न म्हणजेच तपश्चर्या होय. कठ उपनिषदात एक सुंदर रूपक आले आहे. आत्मानं रथिनं विद्धि मनः प्रणहमेव च। इंद्रियाणि ह्यान् आहुः विषयान् तेषु गोचरानप। इथे मन म्हणजे घोड्यांना आवरणारे लगाम होय हे स्पष्ट आहे.

आत्मज्ञानासाठी निरोगी शरीर आणि उत्साही मन याची नितांत आवश्यकता आहे. तसेच दृढ निश्चय व अव्यग्र मन असावयास हवे. आत्मज्ञानाकडे नेणाऱ्या गोष्टीचाच सतत पाठपुरावा करावयास हवा. जर देह वा मन दुखावले गेले तर ते योग्य प्रकारे प्रगती करू शकणार नाहीत. इंद्रिय जया साठी इच्छाशक्ती व विवेक या दोन गोष्टी अतिशय - महत्त्वाच्या आहेत. शरीराला केवळ दंडण करणाऱ्या व्यक्तीची निर्भत्सनाच केलली आहे. (गीता १७.६) कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्रामं अचेतसः। मां चैव अन्तः शरीरन्तर्गत - असणाऱ्या मनालाही कष्टवितात ते अविवेकी आणि आसुर बुद्धीचे लोक असेच समज.

**संन्यस्तवृत्ती :**

पूर्तता प्राप्तीसाठी संन्यस्तवृत्ती आवश्यक आणि हाच वर्णाश्रम पद्धतीचा पायाभूत भाग आहे. वर्ण समाजातील व्यक्तीचे गुण निदर्शनपूर्वक स्थान निर्माण करतो आणि आश्रम वयानुरूप आचरण क्षमता दर्शवितो यामुळे व्यक्ती व समाज यांची योग्य सांगड घालण्यात आलेली आहे. प्रत्येकालाच त्याच्या योग्यतेनुरुप कर्तव्य पालनाची भूमिका निश्चित करण्यात आलेली आहे. स्वतःची घडण व त्यातून समाजाचे कल्याण अशा उभयविध गोष्टी निर्माण करणाऱ्या पद्धतीलाच विशेष महत्त्व प्राप्त झाले. आश्रम या शब्दातच श्रम, परिश्रम करणे हा अर्थ ध्वनित होत आहे. हे परिश्रम तपश्चर्येत रूपांतरित होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य गुणानुरूप आणि वयानुरूप निश्चिय करण्यात आले. या पद्धतीमुळे व्यक्तीचा योग्य विकास व सामाजिक कल्याण या दोन्ही गोष्ट साधल्य जातात. परिश्रम कल्याणकारक होण्यासाठी मनःसंयम आणि तपश्चर्या या मूलभत गोष्टी मानल्या गेल्या मानवी जीवनाच्या चार अवस्था कल्पून प्रत्येक अवस्थेला अनुरूप कर्तव्याची जोड देऊन मानवाला धीरे धीरे प्रगत करण्याचे कार्य साधण्यात आले. प्रगत होऊ लागली तसे व्यक्तीचे अंतःकरणही शुद्ध होऊ लागले. सर्व नाशवंत गोष्टींबद्दलची आसक्ती नाहीशी होऊन ती निश्चल झाली आणि त्यातून तिचा आत्मविकास होऊ लागला.

**तात्काळ संन्यास घेता येत असे :**

अशी क्रमवार पद्धती जरी रूढ होती तरी त्याच्या ठिकाणी ज्या कोण त्या क्षणी विरक्ती निर्माण होईल त्या क्षणीच त्यांनी संन्यास स्वीकारावा, परिव्राजक व्हावे. संन्यासी हा मुक्त आत्मा आहे. तो ब्रह्मचर्याचे पालन करील, फकीरी पत्करेल, सत्याने आचरण करील, कोणाला दुखविणार नाही. भूतमात्रात अभय निर्माण करील. संन्यस्त वृत्तीची कर्तव्ये आणि आश्रम पद्धतीने मानवी आयुष्यातील प्रत्येक कर्तव्य व जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

**पहिली विद्यार्थी दशा :**

या दशेत ज्ञान संपादन, ब्रह्मचर्य पालन, सुदृढ शरीर ही कर्तव्ये प्रामुख्याने सांगितलेली आहेत. गृहस्थी जीवनाचा दुसरा टप्पा, कुटुंब पोषण, अतिथी आणि समाजातील अनाथ अपंग व संन्यासी यांची सेवा केली पाहिजे असा दंडक घातला. प्रौढपणी संसाराचा भार आपल्या मुलावर सोपवून ध्यान, चिंतन, आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी संसारातून निवृत्त होण्यास सांगितले आहे. ही पुढील अवस्थेसाठी पूर्वतयारी म्हणून राहील. संन्यास हा चतुर्थाश्रम त्यानंतर स्वीकारावयाचा असतो. ही जीवनाची परिणत अवस्था होय. या आश्रमात शुद्ध निरिच्छ जगून आत्मकल्याण साधावे आणि जीवन कृतार्थ करावे. याच आश्रमात व्यक्तीला स्वतंत्रता आणि निर्भयता अनुभविता येते. रघुकुलातील राजे कसे वागत हे सांगत असताना कवि कुलगुरू कालिदासाने रघुवंशात आश्रमाची कल्पना सुंदर पद्धतीने मांडलेली आहे. तो म्हणतो ''शैशवेऽभ्यस्त विद्यानां यौवने विषयैषिणां। वार्धवये मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनूत्यजाम्। रघुवंशातील राजे बालपण विद्याध्ययनात घालवीत शरीर व मन सुदृढ करीत. यौवनात पदार्पण करताच इतर सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच यथेच्छ उपभोग घेत, प्रौढपण प्राप्त झाल्यावर मुलांवर राज्यकारभार सोपवून अरण्यात शांत जीवन जगण्यासाठी जात आणि शेवटी योगात प्रवीण होऊन आपली जीवन यात्रा संपवीत असत. यावरून एक गोष्ट ध्यानात येईल की गृहस्थाश्रमाखेरीज माणूस घर करून राहात नसे. विद्यार्जन गुरुगृही शेवटचे दोन आश्रम अरण्य व देशाटन त्यामुळे मानव खऱ्या अर्थाने अनिकेत होतो तरी देखील तो स्थिरमति असतो. अनिकेत: स्थिरमति:।

**ज्ञानाची श्रेष्ठता :**

गीतेत वर्णासंबंधी उहापोह केलेला आहे. त्यावरून प्रत्येक वर्णातील लोकानी करावयाची कर्तव्ये उत्तम पद्धतीने स्पष्ट केलेली आहेत. (गीता १८ श्लोक ४२ ते ४५) यातच समष्टीचे नीतिशास्त्र गीतेने व्यक्त केले आहे. वर्ण हे समाजाचे पायाभूत चार घटक वा खांब होत. सामाजिक स्वास्थ्य, हित, चारी वर्णांच्या व्यक्तींच्या व्यवहारावरच अवलंबून राहणार. वर्णातील प्रत्येक घटकाने मनाचा मोठेपणा, उदारता, सहानुभूती, करुणा ही आपल्या व्यवहारातून व्यक्त होतील हे कसोशीने पाहावे, सहभोजन तसेच बेटी व्यवहार हा कुठेच कुंठित होता कामा नये अशी स्थिती पूर्वी होती म्हणूनच वर्णा वर्णात सलोखा नांदत होता. वर्ण आणि आश्रम ही व्यक्तीच्या विकसनासाठी आणि सामाजिक समतोल राखण्यासाठी निर्माण झाल्याने त्यात कोणताही उच्चनीचतेचा भाग उद्‌भवत नव्हता. या पद्धतीत आणखी एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात येण्यासारखी आहे ती ही की पाशवी सैन्य शक्ती अगर प्रचंड संपत्ती या पेक्षाही ज्ञानाची महत्ता अधिक असल्याचे ओळखले गेले होते. सामूहिक श्रम संपत्ती आणि बळ या सर्वापेक्षाही ज्ञान श्रेष्ठ मानले गेले याप्रमाणे संपूर्ण समाजात एक श्रेष्ठ स्थान निर्माण केले गेले. या स्थानाने सारा समाज बांधला गेला. जीवनातील सर्वश्रेष्ठ प्राप्ती म्हणजे ज्ञान प्राप्ती असे मानले गेले. ज्ञानामुळेच दिव्य जीवन निर्माण करण्याचे ध्येय प्रत्येक मानवाला साकार करता येईल असा विश्वास निर्माण झाला. न हि ज्ञानेन सदृशां पवित्रं इह विद्यते। (गीता)

**समान धर्म :**

समाजिक नीतिमत्ता ही व्यक्तीच्या आचरणातूनच साधली जाते. कर्तव्यपालन हाच तिचा धर्म ठरतो. या धर्माच्या आचरणातूनच अंतर्विकास साधला जातो. बाह्यवर्ती गोष्टीकडे धाव घेण्याची प्रवृत्ती मंदावते. प्रत्येकाने स्वधर्माचे (कर्तव्याचरणाचे) पालन केलेच पाहिजे असा दंडक घातला गेला आहे. आणि अशीच शिकवण गीतेतही आढळते. श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वधर्माप्रमाणे म्हणजे कर्तव्याचे पालनच करावयास लावले आहे. श्रीकृष्ण त्याला सांगतात कर्तव्याचरण करत असताना मृत्यू आला तरी तो योग्य ठरेल. कर्तव्याची म्हणजेच परधर्म भयंकर आहे 'स्वधर्मे निधनं श्रेय - परधर्मो भयावह:। धर्माचरण योग्य पद्धतीने केले असता प्रत्येक व्यक्तीची चित्तशुद्धी होते. मन व हृदय ही उभयता संकुचित विचारातून आणि विकारातून मुक्त होतात म्हणून प्रत्येकाने आपल्या वाट्याला आलेले अगर आपण स्वीकारलेले जे कर्तव्य पालन असेल ते मन:पूर्वक करावे. असे केले असता कल्याण साधता येते. 'स्वे स्वे कर्मणि अभिरत: संसिध्दिं लभते नर:। (गीता) गीता याही पुढे जाऊन अशी शिकवण देते की ''सर्व धर्मान् परित्पज्य मामेकं शरणं व्रग। सापेक्ष पणाने निर्माण झालेले व्यावहारिक जीवन आहे त्या साऱ्या गोष्टीची मर्यादा लक्षात घेऊन केवळ कर्तव्य या नात्याने त्यांचा स्वीकार करण्याने तू मलाच येऊन प्राप्त होशील. त्यात कोणत्याही पाप पुण्याचा लवशेष उरत नाही. तू या सर्व कल्पनापासून मुक्त होशील. म्हणून या साऱ्या कल्पनांच्या अतीत जाऊन कर्तव्याचरण करत रहा. सामाजिक कर्तव्यातूनच मानव दैवी कर्तव्याची पूर्तता करीत असतो त्या नंतरच त्याला दिव्य जीवनाचा अनुभव प्राप्त होतो. (क्रमश:)

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२;
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*विचारगर्भ अशा लेखमालेतील पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या या अंकात मी माझ्या नेहमीच्या लेखनाच्या स्वरूपापासून थोडी फारकत घेण्याची योजिले आहे.

काही वर्षांपूर्वी मी नगरवाचन मंदिर, टेंभीनाका ठाणे या वाचनालयात 'महायोगी अरविंद घोष' ह्यांच्या "Life Divine" ह्या प्रसिद्ध पुस्तकामधील तत्वज्ञान "Audio-Visual" दृकश्राव्य (नाद-दृष्टियुक्त) पद्धतीने व्याख्यान दिले होते. जवळजवळ दोन अडीच तास हा कार्यक्रम चालला.

तेव्हा माझे एक परम मित्र अनेक संस्थांमध्ये मानाचे उच्च स्थान भूषविणारे, कायदे तज्ज्ञ व विव्दान गृहस्थ त्यांनी कौतुकाचे शब्द उच्चारले व अभिनंदन केले. पण, तरीही ते म्हणाले की, ह्या ज्ञानाचा खरा लाभ होण्यासाठी प्रथम एक "Orientation Course" करावयास हवा!!

ह्या प्रसंगाचा व विधानाचा अर्थ माझ्या लक्षात फार उशीरा येतो आहे. तो व्यक्तिगत नव्हता, सार्वजनिक स्वरूपाचा होता!!

दुसरा प्रसंग : श्रीराम शाखेमध्ये एकदा एका सेमिनारमध्ये 'अन्न' ही वैदिक ज्ञानात कोणती नेमकी संज्ञा आहे, हे सांगण्याच्या ओघात दामाजीपंत व विठोबा ह्यांच्या कहाणीतील दुष्काळातील प्रसिद्ध प्रसंगातील उदाहरणाने सुरुवात केली. दामाजीपंतांनी स्वतः सरकारी धान्य गोडाऊनचे अधिकारी असतानाही, धान्याचे कोठार विना परवानगी उघडून दुष्काळग्रस्तांना (वाटले) लुटू दिले, हे सांगत होतो; पुढे मला 'अन्न' ह्या शद्बाची बीजात्मक, व्यापक, वैदिक व तैतरीय उपनिषदातील (बीज) संकल्पना सांगावयाची होती.



**महायोगी अरविंद घोष**

प्रत्येक जीवाची अन्नाची म्हणजे 'भक्षा'बद्दल भिन्न समजूत असते. 'अन्न' भक्षण करणे ही जीवाची कृती परमेश्वर नियोजित असते. एवढेच नव्हे तर अन्नावर वाढलेले 'शरीर' हे दुसऱ्या जीवाचे 'भक्ष' सुद्धा असते, आणि, या अन्नाची निर्मिती, विनियोग हा सर्व भार, निसर्ग किंवा खऱ्या अर्थाने 'प्रकृतीने', घेतलेला असतो.

तसा, उल्लेख ऋग्वेदांतील पुरुषसूक्तात आहे. त्यामुळे अन्नावर खाजगी किंवा वैयक्तिक मालकी हा

मानवी भौतिकवादी व्यवहार व संकल्पना आहे. तो कृत्रिम मानव निर्मित व्यवहार आहे. निसर्ग व ईश्वरच खरा ''मालक'' आहे, हे दामाजीपंताना माहीत होते, आणि, अर्थातच 'विठोबाला' तर माहीत होतेच!!

म्हणूनच त्याने सरकारी नुकसानाचे भरपाईचे पैसे पुरविले, हे स्पिरीच्यूअल ज्ञानाचे संकल्पनात्मक व प्रतीकरहस्यात्मक विश्लेषण करावयाचे होते व त्यातील सत्य, निसर्ग संकल्पना व व्यवहार सांगावयाचा होता.

पण, मला प्रतिबंध करण्यात आला. कारण, काय तर ''ही 'गोष्ट' (कोणती?) लोकांना माहीत आहे. कुठल्या पातळीवर व कोणत्या न्यायावर?? मला सांगण्यात आले. तुम्हाला दिलेला वेळ संपला आहे!!'' असे अनेक प्रसंग माझ्यावर ओढवले.

ह्या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे. मी मान्य करतो!! मी एके काळचा 'मार्क्सिस्ट', त्यामुळे माझा एक मित्र वीर सावरकर भक्त व त्याच्या बरोबर 'सावरकरवाद' व 'योग' यावर अनेकदा चर्चा सहाजिकच व्हावयाची व मी सुद्धा थोड्या असमजुतीने व अज्ञानाने त्याच्याशी गरम व आक्रमक वाद घालावयाचो. मला सावरकर वादाचा व योगाचा पूर्ण परिचय नव्हता. हेच वादाचे खरे कारण होते.

मला हे प्रसंग सांगण्याचे कारण महत्त्वाचे वाटते. दोन व्यक्तींच्या मतातील फरक बघताना वरवर बघून चालणार नाही. व्यक्तींची ज्ञानाची, प्रवृत्तीची व जिज्ञासेची नेमकी कुठची पातळी आहे हे बघावयाला लागते.

त्या व्यक्तींच्या भूमिकांमध्ये फरक असतात व दुसऱ्याच्या मतांचा आदर वा स्वीकार होत नाही. म्हणून वाद होतात. पण, ही गोष्ट तर स्वाभाविकच आहे. मी नवीन काय सांगतो आहे असा प्रश्न विचाराल!!

प्रथम हे वाद एका प्रतिवादी मंडळींच्या प्रथमत: मान्य केलेल्या पातळीवर होतात का, हे पहावयाला हवे! त्यांत सुसंवाद व्हावा ही इच्छा असते का, हे बघावे लागेल! जर वादाची पातळी आध्यात्मिक ज्ञानावर आधारित असेल तर काय?

ह्या प्रश्नाचा विचार 'आत्मचिकित्सेने' व्हावयाला हवा हा मुद्दा आहे! ह्यासाठी तीन व्याहति म्हणजे भू:, भूव: स्व: ह्या तीन स्तरावरच्या ज्ञानाच्या सोपान संक्रमणाचा विषय येतो!!

मी माझे, दुसऱ्या एक मित्राकडे गेलो, तेव्हा सुद्धा माझ्या मनात ह्याच विषयावरचे 'बीज' विचार घोळत होते!!

**मी मित्राला एकदम विचारले की, मी आतां कोणाशी बोलतो आहे ?**

प्रथम तो अत्यंत विस्मयाने व थोड्या रागाने विचारता झाला. ''म्हणजे काय? तुला काय म्हणावयाचे आहे?'' तेव्हा मी म्हणालो की, ''मी आता एक 'बीजेपी' कार्यकर्त्याशी बोलतो आहे की, एखाद्या आर.एस्. एस स्वयंसेवकाशी, की याहून वेगळ्या विश्व हिंदू परिषदेच्या सहानुभूतीकाराशी?''

तेव्हा, त्याने तत्काळ उत्तर दिले ''बीजेपी कार्यकत्याशी'' आता बोला!!

मी ही स्पष्टपणे बोललो की 'मला सध्यातरी फक्त, 'माझ्या मित्राशीच बोलावयाचे आहे'.

ही गोष्ट नंतर खेळकरपणे विनोदावर गेली. पण मला सुद्धा माझे लेखन किंवा व्याख्यान देताना, अनेकदा श्रोत्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाशी संवाद साधावयाचा असतो पण, तो न जमल्यास 'आत्मा' या विषयावर व तत्संबंधी स्तरावर करावयाचा असतो. विशेषत:

'स्पिरीच्यूअल ज्ञान संकल्पना' विशेष वैदिक सत्य ज्ञानाच्या अनुभूती शास्त्रावर आधारलेल्या स्वभावाशी संवाद करावयाचा असतो.

**<u>आणि तो एकदाही होत नाही!! '' का? का? का?'' असे का व्हावे?</u>**

याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. महत्त्वाचे आहे. खरोखर, आज साध्या व्यावहारिक, भौतिक पातळीवरचे संवाद सुद्धा होतच नाहीत. फक्त वाद होतात.

पण, त्याचे कारण शोधणे महत्त्वाचे आहे. पार्लमेंटमध्येही वाद होतात व प्रसंगी गुद्दागुद्दी व हाणामारी, मारामाऱ्या, ओरडाओरडी केल्या जातात. देशाचे व मानवी समाजाचे महत्त्वाचे प्रश्न पाण्यात बुडवण्यात येतात ही गोष्ट आता अपवाद नव्हे, तर नित्याची झाली आहे. याचा दुसरा पर्याय म्हणजे इंडो-पाक समझोता वर्षेन् वर्षे चर्चा गुऱ्हाळ, अनेकदा होऊन ही गुंता सुटत नाही. समझोता होत नाही. राम मंदिर, अयोध्या विरूद्ध बाबरी मशीद हा भौतिक 'वास्तूवरचा' वादही सुटत नाही. रक्त सांडते, जीवन उध्वस्त होते. पॅलेस्टाईन व इस्त्राल ज्यू विरूद्ध अरबी मुसलमान यांचेही वाद सरते शेवटी रक्तरंजित युद्धातच संक्रमण करतात. प्रश्न जगाच्या अंतापर्यंत सुटतील असे वाटत नाही, असे का व्हावे?

याची सर्वसाधारण उत्तरे व भूमिका सर्वांना माहीत आहेत व निष्कर्ष हा दिसतो आहे की, ''**<u>हे असेच चालणार. याला पर्याय नाही.</u>** असेलच पर्याय, तर तो म्हणजे, कुठल्या तरी एका बाजूच्या मंडळींना पूर्णपणे यमसदनाला पाठविणे हाच आहे.

**<u>पण, गंमत अशी आहे की नवीन पिढी आली तरी हे वाद नव्याने किंवा नव्या स्वरूपात पुन्हा उद्भवतात. कसे उद्भवतात व का?</u>**

याचा साधा सरळ अर्थ आहे, पण तो भौतिकवाद्यांना उमजणार नाही. उमजलाच तरी मान्य होणार नाही, आणि त्याची कारणमीमांसा जाणण्याची सुद्धा इच्छा दिसत नाही!!

या अनादि अनंत मानवी, प्रश्नांची उत्तरे भारतीय वैदिक बीज ज्ञान व संस्कृतीत आहेत. मग काय अडचण आहे? याचे मुख्य कारण पूर्वग्रह, अज्ञान व मतभेद!!

"World View" बदलत आहेत, (म्हणजे ह्या जगाच्या, विश्वाच्या खऱ्या अस्तित्वाबद्दलचे ज्ञान!!) ह्याचे सत्यज्ञान आज नाही. कुणालाही नाही. विद्वानांना नाही, शास्त्रज्ञांना नाही. राजकारण्यांना तर अजिबातच नाही. त्यांना त्याची गरजही वाटत नाही!! त्यांचा संदर्भ फक्त भौतिक सत्तावादाशी असतो!! ही समज अनेक धर्मांना नाही, अनेक तंत्र सिद्धि मिळालेल्या व्यक्तींना नाही. कुणालाच नाही.

आहे तो फक्त भ्रमात्मक ज्ञानाचा बुरखा व चष्मा, किंवा एकांगी, सांप्रदायिक कक्षेतील अपूर्ण ज्ञान!! एक पुसटसा 'सत्य' ज्ञानाचा स्पर्श!! सत्य म्हणजे Reality. आजचे रिॲलिटी शो काय दाखवतात टी.व्ही वर?

आपण स्वत: कोण आहोत? आपला जन्म येथे कां झाला? आपल्या जन्माचे व जीवनाचे उद्दिष्ट काय? आपल्याला स्त्री पुरूष आकर्षण का आहे? आपल्याला विवाह का करावासा वाटतो? आपल्याला मुले कां होतात? त्यांच्याबद्दल आपल्याला वात्सल्य का वाटते? आपल्याला वार्धक्य व मृत्यू का येतो. कधी येतो? आपले शरीर का व कसे वाढते? त्या शरीराची शारिरीक, मानसिक व सूत्प आध्यात्मिक वाढ वा प्रगति कशी व कां होते? मृत्यूनंतर आपल्या अस्तित्वाला काही अर्थ आहे कां? पुनर्जन्म होतो कां? होत असल्यास काय फक्त हिंदूचाच होतो? परमेश्वर असलाच, तर तो प्रत्येक धर्माचा निराळा व त्याची प्रजा निराळी व **<u>त्याचा</u>**

**<u>भौतिक व स्पिरीच्यूअल मार्गक्रमणाची दिशा त्यांच्या त्यांच्या नियमांप्रमाणे व धर्माप्रमाणे वेगवेगळी होते. काय???</u>**

वनस्पती व फुले, फळफळावळ पुन्हा पुन्हा का निर्माण होतात? नद्या सतत का वाहतात? चंद्र, सूर्य, तारे हे नियमबद्धतेने का फिरतात? ते या विश्वात कसे व का अवतरले? त्यांनाही 'काल धर्म नियमान अस्त आहे तो कां? अनेक प्रश्न!!

पण, सबंध जीवनांत या प्रश्नाचा उलगडा होत नाही. प्रश्न देखील पडत नाहीत–पडावे असे वाटत नाही– पडल्यास त्याची उत्तरे मिळवण्यासाठी 'यज्ञ' (आत्मयज्ञ) करावा, असे वाटत नाही. एखादे उत्तर मिळाल्यास त्या उत्तराशी विसंगत अशी उत्तरे त्याबद्दलची तत्त्वज्ञाने ह्यांच्यात एकवाक्यता दिसत नाही. ती न दिसल्यास तसा संवाद होऊन 'सत्य' मिळावे असे वाटत नाही!! सामान्य व्यक्तीला, विद्वानांना, राजकारण्यांना किंवा कुणा कुणालाही ही इच्छा होत नाही!! ही अनुत्सुकता का?

मग स्वत:च्या अस्तित्वाची माहिती नसतांना, उलट, स्वत:च्या मृत्यूबद्दल खात्री असताना, हे जीव कोणते जीवन जगतात? संघर्षाचे!! अज्ञानाचे!!

**<u>त्याचे एकच उत्तर!! 'हे आहे सामान्य प्राणी जीवन!! क्षणभंगूर!! मर्त्य!! ''आहार निद्रा, भय मैथून'' – एवढीच ''प्राणी जीवनाची व्याप्ती!! मानतात.''</u>**

प्राण्याची व्याख्या अशी आहे की ते सर्वसाधारण क्षमतेच्या पातळीवर असलेल्या 'विश्वरूपाला' सत्य मानतात. थोडा फरक करून असे म्हणता येईल की अपूर्ण ज्ञानाच्या मर्यादा माहीत नसल्याने त्या प्रचलित अज्ञानावर भरवसा ठेवून जगतात!! याच्या उलट – 'ऋषी' कोणाला म्हणतात? तर, जो ह्या दृश्य जगताच्या रूप व जीवन व्यवहाराकडे सूक्ष्म दृष्टिने पहातो. त्या दृश्यांच्या मागे, दर्शनी रूपाच्या मागे जे तत्त्व लपलेले आहे, ते शोधून काढतात. त्यातील सत्याचा ठाव खोल खोलवर अंतिम विचार करून सत्य शोधतात. एवढेंच नव्हे, तर आपल्याला दिलेल्या इंद्रिय व इतर ज्ञानसाधनेच्या दैहिक साधनाची क्षमता भौतिक भोग वृत्तीतून वाचवून – सत्याच्या शोधासाठी उच्च पातळीवर नेण्याचा यत्न – किंवा तप साधना करतात. त्यांत त्यांना ह्या सूप्त शक्ति व उपाय साधने मानवी शरीर व आत्म्याच्या पातळीवर सांपडतात.

याचा अर्थ उघड आहे. जे आपण विद्यार्थी दशेत असताना, भाषा, गणित, विज्ञान, व्यापार, अर्थकारण, इंजिनीयरिंग, मेडीकल वगैरे ज्ञान क्रमश: मिळवतो त्याचप्रमाणे आपल्या एका वेगळ्या मार्गाने स्वत:च्या व मानवजातीच्या अस्तित्वाच्या मूलभूत व अनंतकाळच्या अनुत्तरित न उलगडलेल्या गूढ प्रश्नाच्या उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. स्वत:च्या उद्धाराचा अभ्यास करावयाचा आहे. त्यालाच 'अध्यात्मज्ञान' म्हणतात. कारण, इथे आत्म्याबद्दलचे ज्ञान मिळवावयाचे आहे.

हे कदाचित तुम्हा सर्वांना माहीत आहेच पण, त्याचा पुन:उल्लेख अशासाठी केला की आपले व्यावहारिक जीवन व वैचारिक पातळीवरच्या ज्ञान प्रवाहात महद्अंतर आहे व ते भौतिकवादी ईहवादी, चंगळवादी सामाजिक व राजकीय जीवन पद्धतीने वाढत, वाढत जाते आहे. दरी जास्त खोल व रूंद होत आहे. त्याचे पर्यावसान अर्थातच मृत्यूकडे होणारी अज्ञानी वाटचाल – न टळणारी – अप्रिय वाटणारी!!

मग ह्या जगात आपले जे नाव व्यवहारी जगात 'जन्म, मृत्यू नोंदीतून राखले जाते त्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ व प्रयोजन काय?

---

काहीच न करण्यापेक्षा थोडे करणे बरे.

हा आहे ''Identity Crises'' व्यक्तिमत्त्वचा गोंधळ 'मी कोण' ह्याचा खरा पत्ता किंवा सद्य जाणीव नाही. प्रत्येक माणसाची 'आयडेंटिटी' रेकॉर्ड आता सर्व देशांतील सरकारे, नगरपालिका, ग्रामपंचायती ठेवत आहेत. नवीन जीवाचा प्रवेश ह्या जगांत झाला की हॉस्पिटल किंवा घरातल्या बाळंतीणीच्या खोलीतील जीवाच्या जन्माबरोबर त्या जीवाची नोंद, जन्मवेळ, त्याच्या जन्मदात्या आई, वडिलांची सुद्धा नोंद ठेवली जाते. एवढेंच काय पण त्याच्या आई, वडलांच्या धर्मावरून त्याचाही 'धर्म' ठरविला जातो. हे सर्व जगांत आश्चर्यकारक एकात्मतेने राबवले जाते!! कारण, हिंदु इस्लाम, ख्रिश्चन, पारशी, शीख, ज्यू वगैरे वगैरे धर्म, हे वारसा हक्काने का प्राप्त होतात हे सहज समजण्यासारखे व मान्य होणारी गोष्ट नव्हे!! ह्या जगाने बलात्काराने, बळाने, फसवणूकीने, युद्धाने, राज्यकर्त्यांच्या जुलमाने, इतर काही अमिषाने धर्मांतरे झालेली पाहिली आहेत, पण पूर्वजांच्या धर्माचा वारसा पुढच्या पिढीतील जीवाला का प्राप्त व्हावा हे समजत नाही. हे मानवी तर्कशास्त्रातही बसू शकणार नाही. पण, प्रत्येक देशाची राजकीय धारणा, घटना, कायदा, ही या गोष्टीला मान्यता देते एवढेच नव्हे तर त्या आधारावर त्या व्यक्तीचे सामाजिक, राजकीय, आर्थिक हक्क सुद्धा प्रमाणित करते.

त्यानंतर ह्या जीवाच्या पुढच्या प्रवासात त्याच्या प्रौढ (Adult) जीवनात त्यांनी अंगिकारलेल्या धर्म, राजकीय मते, सांप्रदायिक शिष्यत्वाबरहुकूम त्याला व्यक्तिमत्त्व दिले जाते. जसे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन वगैरे किंवा मार्क्सिस्ट, कॅपिटॅलिस्ट, लेबर, टोरी, डेमॉक्रॅट, रिपब्लिकन, कॉंग्रेसी, समाजवादी, बीजेपी वगैरे किंवा रामदासी, योगी, साधु, वैष्णव, शैव, वीरशैव, आर्य समाजिस्ट वगैरे किंवा ब्राह्मण  वैश्य, शूद्र वगैरे, अनेक भेद युक्त Exclusive संपूर्ण निवडक व वेगळे व्यक्तिमत्त्व दिले जाते व ओळखले जाते. भौतिक जगात ही त्याची ओळख मानली जाते. ती नित्य स्वरूपाची नसते. बदलत जाते. मग त्याचे खरे अस्तित्व कोणते?

वास्तविक हे सगळे रंग वरवरचे व बदलणारे आहेत. ते फक्त त्या त्या वेळचे, तात्पुरत्या काळात टिकणारे रंग व विचार वा श्रद्धा आहेत. पुष्कळशा ह्या जगात प्रवेश झाल्यावर मिळालेल्या किंवा कमावलेल्या रंगांचे!! मग ह्या शरीराचे रूप, रंग व अस्तिव न टिकणारे आहे. हे काही आत्म्याचे रंग नव्हेत. शरीराच्या नाशानंतर अस्ताला जाणारे आहेत. तरी देखील हे पक्के रंग आहेत. ह्या पद्धतीने व विश्वासाने हा 'अवघाचि संसार' चालतो!!

मग काय जाणीव असावयाला हवी? याचे उत्तर वैदिक ज्ञानपद्धतीत संपूर्णपणे दिलेली आढळेल. पण ह्या पद्धतीकडे आधुनिक जग संशयाने, अविश्वासाने किंवा पूर्वग्रह दूषित विचारानेच पहाते आहे असे दिसेल.

म्हणूनच, काही नमूने म्हणून भौतिकवादी पाश्चात्य संस्कृतीत या बदलत्या व्यक्तिमत्त्वाकडे कसे पाहिले जाते आहे त्याचे काही विचार व नमूने पाहू या.

**Mr. Erik H. Erikson :**

एरिकसन ह्या ज्यू विचारवंताने फ्रॉईडच्या काहीशा बंदिस्त व तोकड्या मानसशास्त्रापासून वेगळा असा क्रांतिकारी दृष्टिकोन मांडला असे मानले जाते. 'Path Breaker' वेगळा फारकतीचा क्रांतिकारक मार्ग म्हणा हवे तर. 'Ego' अहंकार किंवा 'मी' ह्या अस्तित्वाला एक कायम आकार वा स्वरूप जन्मताच असते व त्यांत काही मूलगामी बदल होत नाही असा समज होता. हे एका अर्थाने खरे आहे.

पण, हे व्यक्तिमत्त्व व त्याची जाणीव जीवनभर बदलत जाते असा विचार एरिकसन यांनी मांडला - हार्वर्ड युनिव्हर्सिटीत संशोधन व 'Clinical studies over children' केल्यावर ही थियरी मांडली. या होणाऱ्या



**एरिकसन**

बदलामुळे एक तऱ्हेचे व्यक्तित्वाच्या रूपाचे संकटात्मक प्रसंग निर्माण होतात. त्यालाच त्याने '<u>Identity Crisis</u>' नाव दिले. ह्यालाच आपण 'व्यक्तिमत्त्वाचा गोंधळ' असे नाव अगोदर दिले आहे. त्याला दूसरे नाव '<u>Psychobiography</u>' असेही दिले जाते. ह्या नवीन संकल्पनेमुळे एरिकसन ह्याचे नाव जगभर झाले. तो मार्टिन ल्यूथर किंग व महात्मा गांधी ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाने सुद्धा पुष्कळसा प्रभावित झाला होता.

आपण त्याच्या संपूर्ण थियरीकडे जाणार नाही. पण, त्याच्या अभ्यासाने एक फायदा म्हणजे आपल्याला वैदिक ज्ञानाच्या खरा बोध होण्याचा संभव आहे.

माझ्या अनुभवात असे आले आहे की वेद, उपनिषद, भगवद्गीता वगैरे भारतीय संस्कृतीतील या अनेक संहीतांमधून जीवनाबद्दल संपूर्ण सत्य ज्ञान प्राप्त होऊ शकते. पण, ते ज्ञान ज्या 'भाषेत' ज्या भाषिक संज्ञांमधून, प्रतिकांतून व अनुभवातून उमलू शकते, उमगू शकते, त्या ज्ञानाच्या किंवा अनुभवाच्या पातळीपासून, आपण फार दूर व खाली आहोत. त्यामुळे वेद ज्ञानाची खरी अनुभूती व बोध प्राप्त होण्यासाठी काही गोष्टींची अत्यंत जरूरी आहे.

ह्या कोड्यातील खरी गोम ही आहे की वेदज्ञानाची पातळी अत्यंत उंच आहे. मानवी बुद्धी, इंद्रिय वा तर्क पद्धती ह्या एकत्रित होऊन सुद्धा त्या ज्ञानाची किल्ली उघडणार नाही. पण, 'पिंडी ते ब्रह्मांडी' ह्या अत्यंत महत्त्वाच्या गुरूकिल्लीचा अर्थ हा आहे की पिंडाला म्हणजे ह्या पृथ्वीवरील मानवी फॉर्मला ज्या यंत्रणा, साधने व निद्रित शक्ती दिल्या आहेत, त्यांच्या क्रमाक्रमाने होणाऱ्या उद्धारात या निरनिराळ्या किल्ल्यांचा जुडगा आपल्या कामी येणार आहे. त्यातील मूळ मुद्दा भाषेचा आहे. 'देवभाषा' ही अव्यक्त जग व व्यक्त जग ह्यामधल्या संबधावर आधारलेली आहे व तिला प्रतीकांची भाषा म्हणता येईल. (Manifest, unmanifest, worlds and symblism).

ही प्रतीके भौतिक जगातील इंद्रियगोचर व प्रकृतीच्या जीवनव्यवहारावर आधारलेली असतील. त्यातील नाम, रूप, क्रिया यांच्या अनुभवावरती दिव्य व उच्च कल्पनाशक्तीचा वापर करून मानवाला या देवभाषेचे व्याकरण व साहित्य प्राप्त होऊ शकेल. हाच संदेश श्री महायोगी अरविंद व कापाली शास्त्री त्यांच्या संशोधित ग्रंथातून आपल्याला सांगताहेत. पण, त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे. 'The secrets in vedas, Hymns to Agni' कापालीशास्त्रींची 'सिद्धांजन' व इतर ग्रंथ निर्मीती ह्या गूह्यांचा उलगडा करून दाखवित आहेत.



**कापालीशास्त्री**

आणखी एक मूलभूत फरक आहे पाश्चात्य भौतिकवादी ज्ञान हे मर्यादित व संकुचित आहे. पण, त्याही पेक्षा त्याची संशोधनाची क्रिया ही 'Down up' 'तळापासून वरती जाण्याकडे' आहे. पण, वैदिक ज्ञानपद्धतीत (Top - Down) 'वरून खाली' अशी पद्धती आहे.


हीच गुप्त क्रिया किंवा आपल्याला नवीन वाटणारी पद्धती ही सर्व जीवन रहस्याला लागू आहे. तिचा अत्यंत कल्पनारम्य उलगडा भगवद्गीतेतील १५ व्या अध्यायात पहिल्या श्लोकांत केला आहे.

**श्री. भगवान उवाच :**

''उर्ध्वमूल अध: शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्।

छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्।।१५।।१।।

इथे ''भगवान उवाच'' म्हणजे खुद्द भगवान म्हणाले याचा अर्थ हा की हे प्रत्यक्ष ईश्वराकडून आलेले ज्ञान किंवा ज्ञानाची गुरुकिल्ली आहे. याचा अर्थ त्याला हे अपौरूषेय पण अवतारी पद्धतीचे श्रृती ज्ञान आहे. त्याचा सत्यज्ञान, आत्पज्ञान, या श्रद्धेने फायदा घ्यावा.



**अर्जुन व भगवान श्रीकृष्ण भगवद् गीता**

त्यामुळे 'सृष्टिक्रम' आणि 'सृष्टि संहार' अशा ज्या दोन विश्वनिर्मीतीच्या व लयाच्या क्रिया आहेत. त्यांत आपण 'सृष्टिक्रमाने ब्रह्मापासून आकाश, वायू, तेज, जल, पृथ्वी व नंतर शब्द, स्पर्श, रूप, गंध व नंतर श्रोत्र, त्वक, चक्षु, जिव्हा व घ्राण ह्या पंचोद्रियांपर्यंत आलो आहोत. हा उतरंडीचा क्रम आहे. अव्यक्तातून व्यक्त पण, मर्त्य जग व वस्तुंकडे येण्याचा हा क्रम हेतु पुरस्सर व यज्ञ प्रकृतिचा आहे!!

ह्या पुरुष रूपातील पंचेद्रियांवर आधारलेल्या ज्ञानाच्या अनुभूतींना उलट्या म्हणजे ''सृष्टिसहारांच्या'' मार्गक्रमाने मूळ बीजात्मक ज्ञानाकडे जावयाचे आहे. बीज ज्ञान अव्यक्त स्वरूपातून उद्भवले आहे.

म्हणजेच, ह्या अश्वत्थ वृक्षाच्या पान, फळे, फुले ह्याच्या ज्ञानापासून फांदी, खोड व नंतर जमीनीखालच्या बीजापर्यंत जाऊन बीज ज्ञानाचा अभ्यास करावयाचा आहे.

भिन्न भिन्न Epistemology म्हणजे ज्ञानपद्धतीत, हा मूलभूत फरक आहे. पाश्चात्य भौतिकवादी व भौतिक विज्ञानवादी पद्धतीतील 'Methodology' ही इंद्रियांना मिळणाऱ्या ज्ञानाला सत्य मानून – Reality status देऊन प्रगती करू इच्छिते. त्यामुळे, ह्या 'मर्त्य भौतिक वस्तू ज्ञानाच्या' वर्तुळातील मर्यादितच, हे ज्ञान सामावले जाते व त्याच्या सीमांचे उल्लंघन ''Transcandence'' करू शकत नाही.

त्यामुळे चंद्रावर मानव जाऊ शकेल. पण सूर्य, चंद्र ह्यांच्या उत्पत्तीबद्दल किंवा त्यांच्या मधील नात्यांबद्दल गूढ ज्ञान मिळवूं शकणार नाही. ह्या प्रकृती निर्मीत आणि सृष्टिनिर्मीत सूर्य चंद्र हे पृथ्वीवरील जीवन कसे व का नियमित करत आहेत, त्यांतील जीवनधारा, अन्न, पाणी

(पान क्र. ४० वर)

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यामिक विभाग

☆ शनिवार दि. १३ फेब्रवारी रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ व वार्षिक 'पारिजातक' अंकाचे प्रकाशन झाले. सदर कार्यक्रमासाठी प्रा. सौ. पुष्पा भावे व प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थींनी प्रिया व प्रीती निमकर उपस्थित होत्या.

☆ शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात विशेष 'स्मरणिका' प्रकाशन मा. सौ. मोहिनी निमकर यांच्या शुभहस्ते व मा. श्री. डॉ. यशवंत पाठक या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शनिवार दि. २० फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे संपन्न झाला.

☆ श्री. रामचंद्र मिशन आणि संयुक्त राष्ट्र केंद्र भारत आणि भूतान यांच्या संयुक्त विद्यमाने २१ फेब्रुवारी रोजी आयोजित आखिल भारतीय निबंध लेखन स्पर्धेत इ. ६ वी ते ९ वी च्या गटात संपदा कुलकर्णी (९ अ) व ऋतुजा चंद्रराव (९ अ) यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

☆ रोटरी क्लब, बांद्रा येथे झालेल्या नृत्यस्पर्धेत कु. अपर्णा मुळीक (९ ब) हिला डायमंड कडे आणि १०१ रु. चे पारितोषिक मिळाले.

☆ दि. २६ फेब्रुवारी रोजी भारतीय समाज विकास अकादमी यांच्यातर्फे : स्वातंत्र्य, समता व बंधुता ही राज्यघटनेची मूलभूत तत्वे मानून स्थानिक पातळीवर सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याच्या महनीय कार्याच्या गौरवार्थ राष्ट्रीय एकात्मता फेलोशिपचे मानपत्र देऊन माननीय मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांचा पदक, प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

☆ शाळेच्या मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर या २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या रिक्त पदावर मुख्याध्यापिका म्हणून सौ. सुनिता देशपांडे या कार्य पाहत आहेत. उपमुख्याध्यापक म्हणून श्री. जगन्नाथ गवई व पर्यवेक्षक म्हणून श्री. एस. आर. गढरी सर यांना पदोन्नती मिळाली आहे.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २००९:**

| इयत्ता | परिक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेल विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | २६ | २४ |
| ८ वी | २१ | १८ |
| १० वी | २६ | २२ |

**सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | ईशा पुंतांबेकर | ९० |
| ८ वी | अक्षय छिद्रवार | ९२ |
| | नेहा पुसाळकर | ९२ |
| १० वी | मुस्तफा करी | ९६ |

**गणित पारंगत परीक्षेचा निकाल :**

१००%

कु. वृषाली प्रसादे – ७८ गुण – विशेष प्रावीण्य

कु. कृणाल चौधरी – ७६ गुण – विशेष प्रावीण्य

स्काऊट मास्टर श्री. केशव चौधरी यांना महाराष्ट्र राज्य स्काऊट व गाईट संस्थेतर्फे सन २००८–२००९ या वर्षाचे सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय स्काऊट मास्तर पुरस्कार माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकरावजी चव्हाण यांच्या शुभहस्ते देण्यात आला.



**श्री. केशव चौधरी मा. मुख्यामंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना**

इ. ६ वीतील विद्यार्थी कु. अथर्व प्रधान याने स्मार्ट किड्स क्रिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उच्च स्तरावरील राष्ट्रीय ॲबॅकस परीक्षेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकावला.

**NSTSE युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – २०१०**

निकाल : १००%

परीक्षेला बसलेले विद्यार्थी – ०९

उत्तीर्ण विद्यार्थी – ०९

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २००९ – २०१० :**

| इ. परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| ५ वी बालबोधिनी | १६ | १३ | ०२ | ०१ | – |
| ६ वी प्राथमिक | १४ | ०२ | ११ | ०१ | – |
| ७ वी प्रवेशिका | ०४ | – | – | ०३ | ०१ |
| ८ वी सुबोध | ०१ | – | – | ०१ | – |
| ९ वी प्रबोध | ०३ | – | – | ०१ | ०२ |

**रामायण परीक्षा २००९–२०१० :**

१००% निकाल

परिक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी २०

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी २०

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| १० | ९ | ० | १ |

**गीताई पाठांतर स्पर्धा २००९–२०१० :**

१००% निकाल

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी १८५

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी १८५

| विशेष प्रावीण्य | प्रथमश्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| २७ | ९५ | १७ | ४६ |

**गणित प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल २००९ – २०१० :**

ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ आयोजित

गणित प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे लागलाः

१) कु. श्रीहरी बोडस – सुवर्ण पदक आणि शिष्यवृत्ती विजेता : इयत्ता ५ वी

२) कु. ओंकार साठे – रजत पदक आणि प्रमाणपत्र विजेता : इयत्ता ५ वी

## विधी महाविद्यालय

☆ दि. १२ फेब्रुवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात डॉ. व्ही. एन्‌. बेडेकर वादविवाद स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे हे पाचवे वर्ष होते. स्पर्धेचे उद्‌घाटन मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. वि. करंदीकर यांनी केले.

या स्पर्धेत मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या नऊ विधी महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी १) मतदान सक्तीचे करावे. २) अशक्य विवाहसंबंध ही घटस्फोटासाठीची अट व्हावी ३) खासदारांचा विकासनिधी रद्द व्हावा, हे विषय होते. स्पर्धेत नारी गुरुसाहनी लॉ कॉलेज, उल्हासनगर (रु. तीन हजार रोख) यांनी, प्रथम, गव्हर्नमेंट लॉ कॉलेजने द्वितीय (रु. दोन हजार रोख) तर के. सी. लॉ. कॉलेजने तृतीय क्रमांक पटकाविला. (रु. एक हजार रोख), व उत्तम वक्त्यांची पारितोषिके अनुक्रमे कु. पूनम जागियासी, नारी गुरुसाहनी लॉ कॉलेज, उल्हासगनर, श्री. सागर राणे, गव्हर्नमेंट लॉ कॉलेज आणि कु. निलाक्षी सागवेकर, ठाणे विधी महाविद्यालय यांनी मिळविले.

श्री. दिलीप जोशी, निवृत्त जिल्हा न्यायाधीश व ॲड. सौ. मृणाल दोशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सर्व विद्यार्थ्यांचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

स्पर्धेच्या यशस्विततेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी यांनी प्रभारी प्रचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांना उत्तम सहकार्य केले.

☆ S.K. Somaiya College तर्फे दिनांक १५ व १६ फेब्रुवारी रोजी 'UGC Sponsored National Seminar' मानव अधिकार आणि कायद्याची भूमिका मध्ये प्रभारी प्रचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार 'Political Right to vote in India - the Role of law' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

☆ दि. २६ फेब्रुवारी रोजी वि.प्र.मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा तसेच महाविद्यालयात स्थापन झालेल्या मराठी वाङ्मय मंडळातर्फे मराठी दिवस साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री. वि. करंदीकर तर विशेष अतिथी म्हणून सुप्रसिद्ध सूत्रसंचालक मुलाखतकार श्री. सुधीर गाडगीळ उपस्थिती होते.

महाविद्यालयातील सर्व गुणवंत क्रीडापटू व इतर विविध सांस्कृतिक स्पर्धांत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर विशेष अतिथी श्री. सुधीर गाडगीळ यांनी आपल्या खुमासदार शैलीत 'मुलाखावेगळी माणसं' हा त्यांचा 'बहारदार कार्यक्रम सादर केला. यात त्यांनी राजकरण, क्रीडा, कला यांसारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे मुलाखतीदरम्यान आलेले वेगवेगळे अनुभव व किस्से सांगून श्रोत्यांना खिळवून ठेवले. त्यानंतरच्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात उत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जीवनातील विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्विततेसाठी महाविद्यालयातील सर्वांचे योगदान लाभले.

शब्दांकन

**प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादर**

## वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन

### ☆ महिला दिनाचे आयोजन

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून ISTE चॅप्टरतर्फे विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात महिला दिनाचे आयोजन दिनांक ८ मार्च रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत करण्यात आले. तंत्रनिकेतनातील सर्व महिला एकत्र येऊन हा दिन त्यांनी साजरा केला. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. माधुरी ताम्हाणे ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांची ओळख तंत्रनिकेतनातील इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विभागप्रमुख प्रा. सौ. किर्ती आगाशे यांनी उपस्थितांना करून दिली. प्रमुख पाहुण्या सौ. माधुरी ताम्हाणे ह्या मुलाखतकार म्हणून प्रसिद्ध आहेत. संपादिका म्हणून त्यांनी काम केले आहे. दूरदर्शन व आकाशवाणीवरून त्यांच मुलाखतीचे कार्यक्रम होत असतात. त्या १९७५ सालापासून ह्या क्षेत्रात त्या काम करीत आहेत. त्यांच्या अनुभवांचा लाभ उपस्थितांना नक्कीच झाला.

प्रा. सौ. आर. के. जांभाटेकर यांनी सौ. ताम्हाणे यांना भेट वस्तू देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी ISTE चॅप्टरच्या प्रमुख प्रा. सौ. जी. एस्. इंगवले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला तंत्र निकेतनातील सर्वच महिला आवर्जून उपस्थित होत्या.

**शब्दांकन – श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२६२७०**

(पान क्र. ३६ वरून)

**भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना**

व प्राणशक्तीचे वाटप व नियमन कसे करीत आहे. कुठच्या वैश्विक नीती तत्वाने व जबाबदारीने करत आहे. मानवी मनावर चंद्र व इतर ग्रह ताऱ्यांचा का व कसा प्रभाव पडतो आहे. हे जाणू शकणार नाही!!

गंमत अशी आहे की ज्या चंद्रयानाचा अजेंडा 'Indian Agenda' आहे असे जाहीर करण्यात, भौतिकवादी वैज्ञानिक विश्वास ठेवतांना दिसतात त्यांना खरा 'भारतीय अजेंडा' काय असावयाला हवा एवढेही भान किंवा ज्ञान नाही व प्रश्न पडत नाहीत.

इथे आता लेखाच्या मर्यादेवर अवलंबून असल्याने थोडा श्वास घेऊं या.

पुढील दिशाच्या अंकात भौतिकवादी वैज्ञानिक व फिलॉसॉफर्स तत्वचिंतक काय अभ्यास करतात व कोणत्या निष्कर्षावर येतात ते पाहू या.

तिथे ते थांबले त्याची कारणे शोधु या. मग, वेदिक ज्ञानपद्धतीतच ही वैश्विक गूढ सत्ये का शोधता येतील व त्यांचा खरा बोध, 'खऱ्या ज्ञात्याला' (जीवात्मा) याला होईल, ह्या अमर ज्ञान क्रियेची चर्चा करू या!!

।। हरी ॐ ।।

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

मुखपृष्ठावरून

संपादकीय

**शिक्षण हक्क विधेयक**

शिक्षणाच्या या नवीन अधिकारात प्रत्यक्ष शिक्षण वितरणाच्या प्रक्रियेपासून गणवेशापर्यंत सर्व जबाबदाऱ्या सरकारने आपल्या माथ्यावर घेतल्या आहेत. आजही बहुसंख्य मराठी शाळा या सरकारी अनुदानावर चालतात. अशा शाळांतून कोणतेही शुल्क घेतले जात नाही आणि पुस्तके, मधल्या सुटीतील आहार हे सर्व काही या ना त्या स्वरूपात मोफत देण्यात येते. इतके सर्व होऊनही आज अशा बहुसंख्य, विशेषत: महापालिका व ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती समाधानकारक नाही. या शाळांना गेल्या ८-१० वर्षांत शिक्षणेतर अनुदान सरकार देऊ शकले नाही. असे अनुदान न मिळताही, फी किंवा तत्सम कुठलाही खर्च न घेताही, या शाळांनी हा खर्च कसा केला, याची ना त्या शाळेच्या पालकांना, ना शिक्षण तज्ज्ञांना वा सरकारला पर्वा.


इंग्रजी माध्यमांच्या शाळा विना अनुदान तत्वावर चालू असून त्यांना शिक्षण शुल्क घेण्याचा अधिकार आहे. पण अशा फी संदर्भात चालू असलेले आरोप, प्रत्यारोप व गोंधळ भयावह आहेत. हे सर्व वास्तव असतानाही हे विधेयक क्रांतिकारक कसे होऊ शकते हे मोठे कोडे आहे. आजचा आपला केंद्र सरकारचा शिक्षणावरील खर्च हा १.३३ लाख कोटी म्हणजे राष्ट्रीय स्थूल उत्पन्नाच्या ३% आहे. यांतील महत्त्वाचा खर्च शिक्षकांच्या पगारावरील आहे. नवीन शैक्षणिक इमारती वा आधुनिक साधनांची पूर्तता यांवरील खर्च नगण्य आहे. शिक्षणाच्या हक्काचे हे विधेयक आल्यावर हा खर्च राष्ट्रीय स्थूल उत्पन्नाच्या ६% तरी होणे आवश्यक आहे. या खर्चाची ५५% केंद्र व ४५% राज्य अशी विभागणी केली गेली आहे. या विधेयकानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक शुल्क तर नसेलच, परंतु गणवेश, दुपारचे खाणे, वाहतूक हे सर्व मोफत मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. यामध्ये वर्गातील विद्यार्थी संख्या ३० पेक्षा अधिक ठेवता येणार नाही. सध्या ती ६० आहे. सर्व शिक्षक पूर्णवेळ असतील. लगेच निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या लक्षात घेतली तरी पुढील पाच वर्षात कमीत कमी वीस लाख शिक्षकांची गरज भासणार आहे.

२०१०-११ च्या केंद्रीय वा राज्य अर्थ संकल्पात विद्यमान शैक्षणिक खर्चात फुटकळ वाढ सोडली तर या विधेयकासाठी लागणाऱ्या खर्चाची सोय केल्याचे कोठेही दिसून येत नाही. या योजनेनुसार ८ वी पर्यंत कुठलाही विद्यार्थी नापास होणार नाही. शाळेच्या व्यवस्थापनात ७५% पालकांचा समावेश बंधनकारक आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक शाळेसाठी वेगळी स्थानिक व्यवस्थापन समिती असणार आहे. हे ही कमी आहे, म्हणून की काय, राष्ट्रीय बालहक्क आयोगाची स्थापनाही होणार आहे. सगळे मोफत देणाऱ्या सरकारी शाळांची दिवाळखोरी आणि खाजगी व्यवस्थापनांवर येणारी बंधने बघता, या देशातील प्राथमिक शिक्षणाचे १००% 'सरकारीकरण' म्हणजे दिवाळखोरी अपरिहार्य आहे.

जगात फुकट काहीही नसते, स्वस्त कधीच मस्त नसते, हे माहीत असूनही अशी विधेयके आणण्याला क्रांतिकारक म्हणावं याच्यासारखी शिक्षणाची दुसरी शोकांतिका नाही.

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006




# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, जुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.